# कोण जिंकला कोण हरला

कृष्ण चैतन्य



प्रकाशन विभाग

# कोण जिंकला कोण हरला

कृष्ण चैतन्य

अनुवाद
अविनाश छत्रे

चित्रकार
पी. खेमराज

प्रकाशन विभाग
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार

प्रथम आवृत्ति : एप्रील १९८२ (चैत्र १९०४)

© प्रकाशन विभाग

To far-off lands long ago (Marathi)

किमत : रु० 5.50

प्रकाशक : निदेशक, प्रकाशन विभाग, माहिती व नभोवाणी मंत्रालय
पटियाला हाऊस, नवी दिल्ली-११०००१

प्रकाशन विभाग : विक्री केंद्रे

सुपर बझार (दुसरा मजला), कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११०००१

कॉमर्स हाऊस (दुसरा मजला), करीमभाई रोड, बॅलार्ड पियर, मुंबई-४०००३८

८, एस्प्लेनेड ईस्ट, कलकत्ता-७०००६९

एल एल ए ऑडिटोरियम, ७३६, अण्णा सालई, मद्रास-६००००२

बिहार स्टेट कोऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, अशोक राजपथ, पाटणा-८००००४

प्रेस रोड, त्रिवेंद्रम-६९५००१

१०-बी, स्टेशन रोड, लखनौ-२२६००१


मुद्रक— प्रबंधक, भारत सरकार मुद्रणालय, नासिक, ४२२००६

अनुक्रम

प्रवेशापूर्वी . . . . . . .

कोण जिंकला, कोण हरला ? . . . . . . . १

हत्ती व भट्टतित्तर . . . . . . . ३५



## प्रवेशापूर्वी

हे सारे निवेदन आहे प्रौढांसाठी—मुलांसाठी नव्हे. कारण गोष्टी समजण्याच्या कामांत ती मोठ्या माणसांपेक्षा जास्त प्रगल्भ असतात. पण मोठ्या माणसांना मात्र प्रत्येक गोष्ट खुलासेवार लागत असते.

या दोन्ही कथा बौद्ध जातक कथांवर आधारित आहेत. पण माझ्या ह्या आधीच्या बालसाहित्याप्रमाणे येथेही मी त्या संक्षिप्त स्वरूपांत घेतलेल्या आहेत. त्यांचे स्वरूप काहीसे मुक्त, स्वैर आढळले तरी त्यातून काहीतरी चांगलेच निष्पन्न होईल, अशी मला आशा वाटते.

यापैकी पहिल्या कथेबद्दल सांगावयाचे तर तिच्या मूळकथेसाठी फक्त दोन दंतकथा आढळल्या. राक्षसांनी प्रवाश्यांना फसविणे आणि अखेरीस खाऊन टाकणे ही एक आणि वाळवंटांत पाण्यासाठी खोदकाम करणे ही दुसरी. तेव्हां मनांत असा विचार आला, की, यांतूनच एखादी नवी कहाणी उभी राहू शकेल व तीत प्राचीन भारतीय व्यापारी काफिल्याचे जीवनही चित्रित करता येईल. या कहाणीतील सारा तपशील मुळाबर-हुकूमच घेतलेला आहे आणि प्राचीन कथांमधून त्याचा उल्लेखही आहे.

बामियनमधील वीणकामाबद्दल असे वाटले की, आपल्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडण्यासाठी समकालीन महत्त्वपूर्ण आस्था निर्माण करण्यास त्याचा उपयोग होईल. पण त्यासाठी थोडयाफार "अनॉक्रॉनिझम" चीहि जोखीम घेणे प्राप्त होते. त्यासाठीच प्रस्तुत कथेचा निश्चित काळ कोणता, याबद्दल मुद्दामच संदिग्धता पाळण्यांत आली आहे. परतु सातव्या शतकांत ह्यू एन त्संगने जेव्हां बामियनला भेट दिली तेव्हा तो भाग चांगला समृद्ध होता व या कहाणीत सांगितल्याप्रमाणेच तेथे बामियन वसाहतीच्या सुरवातीचा काळ उल्लेखिलेला आहे. हा काळ थोडासा अगोदरचाच घ्यायला हवा. म्हणूनच, नवव्या शतकांत पाल राजघराण्याच्या आश्रयाखाली अस्तित्वांत असलेल्या विक्रमशीला विद्यापीठाचा निर्देश योग्य ठरत नाही. तथापि नंतर असेही वाटले की, मुलांना तक्षशीलेप्रमाणेच या महान केंद्राचीहि माहिती झाली, तर ते योग्यच ठरेल.

दुसरी कथा काळचा "टोनॅलिटी" ची आहे. आजच्या पिढीस भीषण व अडचणींनी ग्रस्त जगतापासून निष्कारण अलिप्त ठेवण्यांत अर्थ नाही कारण त्याच जगांत तिला वावरावयाचे आहे. दोन जातक कथांपासून घेतलेल्या निव्वळ दंतकथांचा नंतर विकास केला, त्यांना आकर्षक नैसर्गिक इतिहासाची, पक्षी व हत्ती यांबाबतच्या गीतांची जोड दिली व त्यामुळे, जवळजवळ मी साठ पावसाळे पहिले असता, संध्याछाया हृदयास भिववू लागल्या असतानाहि, फिरून तारुण्य प्राप्त झाल्याचा भास झाला.

**कृष्ण चैतन्य**

# कोण जिंकला ?

# कोण हरला ?

आपलं आयुष्य आरामशीर करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी लागतात, त्या कुठनं येत असतील ? याचे उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे कधी तुम्ही ?

भारताच्या सगळ्याच भागांत त्यांना लागणार सा-या प्रकारचं धान्य-तांदूळ, गहू किंवा फळे आणि भाज्या पिकत नाहीत. पण तुम्हाला नागपुरची संत्री दिल्लीत विकत घेता येतात तर काश्मिरांतली सफरचंद कन्याकुमारीतहि खरेदी करता येतात. दिल्लीमध्ये तर आपल्या देशाच्या सगळ्याच भागांतून आलेली मुले राहतांना आढळतात. सणासुदीचे दिवस आले, की, गुजराती मुलीला सुंदरसा स्कर्ट मिळतो. त्याला छोटे छोटे गोल गोल आरसे जोडलेले असतात नि जरीकामाचीहि जोड दिलेली असते. हा स्कर्ट बनविलेला असतो सौराष्ट्रांत पण तो दिल्लीतही मिळू शकतो. काश्मिरांतले विक्रेते तमिळनाडूत घरोघर जातात आणि सुंदर सुंदर शाली विकतात.

आज आपल्याकडे आगगाड्या, बसगाड्या, आगबोटी, फार काय विमानेंहि आहेत आणि त्यातनं व्यापारी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणाकडे जातात व आपापला माल विकतात. पण आता खूप खूप जुन्या काळाची दोन हजार किंवा दीड हजार वर्षांपूर्वीची व त्याकाळांतल्या स्थितीची कल्पना करा. त्यावेळी व्यापाऱ्यांना आपापला माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे नेण्यासाठी फक्त जनावरांनी ओढावयाच्या गाड्याच काय त्या मिळायच्या. आता या सगळ्याच गाड्या किती हळू चालतात हे तुम्हाला माहित आहेच. मग त्या काळांतल्या मुलांची काय अवस्था होत असेल ? ती राहात असलेल्या भागाच्या आसपास होणाऱ्या जिनसांवरच त्यांना समाधान मानावे लागत असेल काय ?

तुमचा अजिबात विश्वास बसणार नाही, पण त्यावेळचे भारतीय व्यापारी केवळ या देशांतच निरनिराळ्या ठिकाणी फिरत नसत, तर, आपला माल विकण्याकरीता अगदी दूरवरच्या देशांतही जात असत. तुम्हाला भूगोलाची भीति वाटते, होय ना ? त्याचे कारण तुम्हाला ज्या कोणी भूगोल शिकविला असेल त्यांनी तो बहुधा नीट शिकविला नसावा. पण तुम्ही जर तुमच्या अॅटलासची पानं चाळली आणि त्याच्या मदतीने पर्वत, नद्या, समुद्र तसंच, निरनिराळे देश यांचा अभ्यास केलात, तर तुम्हाला भूगोल शिकतांना मजाच मजा वाटू लागेल. आता नकाशावर रोम शहर शोधून काढा. ते खूपच दूर आहे नि तेहि आफ्रिका, आशिया, यांच्या पलीकडे भूमध्य समुद्रानं वेगळया केलेल्या इटालीत ! इतकं असूनही आपल्याला



2—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/81

इतिहासाच्या पुस्तकांत अशी माहिती मिळते की, दोन हजार वर्षापूर्वी तेथल्या प्लीनी नावांच्या लेखकानं आपल्या शहरांतल्या रोममधल्या लोकांना अशी विनंती केली होती, की, त्यांनी भारतातनं येणाऱ्या कापडावर, हस्तकलेच्या वस्तूंवर आणि सुगंधी द्रव्यांवर इतका पैसा उधळू नये. अर्थात् रोमच्या लोकांनी ही विनंती मनावर घेतली नाही, ही गोष्ट वेगळी ! कारण, भारतातनं येणाऱ्या वस्तु सुंदर तर असायच्याच, पण तशा वस्तु जगांत दुसरीकडे मिळतही नसत.

पण या वस्तु इतक्या दूर अंतरावरच्या युरोपला पोचायच्याच कशा ? त्या काळचे रस्ते आजच्या रस्त्याइतके चांगले नसतीलहि कदाचित् पण प्राचीन काळातहि रस्ते होतेच आणि ते देशांतल्या सगळ्या भागांना जोडलेलेहि होते. यापैकी एका अत्यंत प्रसिद्ध रस्त्याचं नांव होतं उत्तरापथ म्हणजे उत्तरेकडून जाणारा रस्ता! असा हा रस्ता मोठा होता, लांबलचक होता, म्हणजे कसा होता हे समजून घेण्यासाठी तसेच, त्या काळांतले व्यापारी आणि सर्व सामान्य लोक इतके लांब कसे जात हे समजून घेण्याकरीता तुम्हाला फिरुन ॲटलास उघडावा लागेल. आपल्या देशाच्या पूर्व भागांतून अनेक छोटे रस्ते त्यावेळी पाटण्यांत एकत्र होत असत. हे पाटणा शहर बिहारची राजधानी आहे नि त्याचं त्यावेळचं नांव पाटलीपुत्र होतं हे तुम्हाला माहित आहेच. भगवान् बुद्धांच्या काळांत आणि त्यानंतरहि कित्येक शतकं ! तर त्यावेळेचा हा महामार्ग या पाटणा नगरापासून सुरु व्हायचा नि काशी (वाराणसी) आणि मथुरा या शहरांतून थेट पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत ओलांडून सरळ अफगाणिस्तानलाच जायचा. अफगाणिस्तानांत बल्ख इथे पोहोचल्यावर, त्याला अनेक फाटे फुटत. एक फाटा पूर्वेकडून वळून थेट चीनला जायचा, तर दुसरा उत्तरेकडे वळून एशिया मायनर किंवा तुर्कस्तानला पोहोचायचा. तिसरा मार्ग पश्चिमकडे वळून भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांना जाऊन मिळायचा. म्हणजे या शेवटच्याच मार्गाने मुख्यतः, भारतीय माल रोमला व युरोपच्या इतर भागांना पोहोचायचा. याचं कारण, रोमची जहाजं भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांतूनच हा माल भरून घेत असत. त्या काळांत वाफेचीं किंवा डिझेलचीं इंजिनं नसत तथापि ही जहाजे शिडं उभारून व्यवस्थित वाटचाल करीत असत; खेरीज, काही जहाजांना सुकाणूही असावयाची काही जहाजांना तर तीन-तीन ! या जहाजांच्या दोन्ही बाजूना प्रत्येक ओळीत अनेक नावा वल्हवणारे असावयाचे.

अर्थातच हे आयुष्य सुखा-समाधानाचे नव्हतेच. त्यामानाने आज कितीतरी सुखसोयी उपलब्ध आहेत. परंतु धाडसी माणसांना या अडचणीच स्फूर्तिदायक वाटत आणि त्यामुळे सहज सोपा नि सुरळीत वाटणारा प्रवास त्याकाळी अनेक संकटांनं भरलेला नि म्हणूनच साहसी वीरांना प्रेरक ठरणारा वाटे.

आणि ही पण अशीच एका साहसी वीराची गोष्ट आहे. त्या काळांतल्या फार फार वर्षापूर्वीची ही कथा. पाटलिपुत्र नावांच्या शहरांत नंद नावाचा एक श्रीमंत व्यापारी राहत होता. त्याकाळचे व्यापारी अनेक लोकांना रोजगार देत, या देशास पैसा मिळवून देत आणि

आपला माल अगदी दूरवरच्या देशांतहि विकावयाचे. त्यामुळे व्यापाऱ्यांना समाजांत मान असे. अगदी राजे लोक सुद्धा महत्त्वाच्या बाबतीत त्यांचा सल्ला घ्यावयाचे. पण इतके असूनहि हा नंद मात्र सुखी नव्हता. याचे कारण तो म्हातारा होत चालला तरीहि त्याला मुलगा नव्हता. आपल्यामागे आपला व्यापारधंदा कोण चालवणार ही फिकीर त्याला होती. आपल्या आयुष्याचे उरलेले दिवस सुखाने काढण्याइतका पैसा त्याने गाठीला बांधला होता. पण त्याला अशी काळजीच नव्हतीच. परंतु आपला व्यवसाय जर आपल्यामागून कोणीहि चालवला नाही, तो बंदच पडला, तर इतक्या लोकांच्या पोटा-पाण्याची सोय काय? त्यांना आपापले रोजगार नक्कीच गमवावे लागणार. नाही म्हणायला त्याला एक मुलगी मात्र होती—सुनंदा तिचे नांव. ती सुंदर तर होतीच, पण स्वभावानेहि फार चांगली होती. परंतु त्याचबरोबर हेहि खरे होतं की, ऊटांचे तांडे, व काफिले घेऊन परदेशी जावयाचे नि त्यावरील माल विकावयाचा, असले अवजड काम तिला जमले नसतेच.



अशा रीतीने अनेक दिवस फिकीर केल्यानंतर, नंदास एक कल्पना सुचली. आपल्या मुलीचे एखाद्या सुयोग्य तरुणाशी लग्न करून द्यावे असे त्याने ठरविले. मात्र तो युवक असा असावा की जो आपल्या सासऱ्याची ही जबाबदारी उचलेल व नीट प्रकारे पार पाडू शकेल.

नंद धनिक असल्याने कित्येक तरुण त्याच्याकडे आले व आपण त्याचा व्यापार उदीम चांगल्या प्रकारे चालवूं अशी ग्वाही देऊ लागले. पण त्यापैकी बहुतेक जण नंदाच्या दृष्टीने अयोग्यच ठरले. खुद्द नंदाने आनंद नावाच्या एका देखण्या तरुणाची निवड केली होती. हा आनंद काही व्यापारी घराण्यांतला नव्हता, कारण त्याच्या वडीलांनी आणि आजोबांनी मगध देशाच्या राजाच्या सैन्यांतच नोकऱ्या केल्या होत्या परतु हा आनंद चांगला शिस्तशीर, बुद्धिमान् आणि अत्यंत योग्य असा असल्याचे नंदास आढळून आले होते. पण त्याचबरोबर जीवक नावाचा आणखीहि एक तरुण तेथे होता. तथापि तो विशेष चुणचुणीत नव्हता आणि काहीसा मलुल व ध्येयहीन असाच होता. पण तो संपन्न व्यापारी घराण्यांतला होता नि त्याच्या वतीने इतकी माणसे नंदाशी बोलायला आली की तो बिचारा म्हातारा फिकीरीतच पडला.

पण तशांतहि त्याला या अडचणीतून निसटण्याचा मार्ग सांपडलाच. त्याने असे ठरविले की, आनंद आणि जीवक या दोघांनाही प्रेत्यकी पांचशे गाडयांचा तांडा विकत घेण्यासाठी भरपूर पैसे द्यावयाचे त्यांच्या पैकी जो कोणी भरपूर नफा मिळवून आणील त्याच्याशी सुनंदाचे लग्न करून द्यावयाचे. नंतर हा जावईच आपल्या बायकोच्या मदतीने नंदाचा मोठा परंपरागत व्यापार चालवील.

जीवक स्वभावाने फारसा चांगला नव्हताच. जेव्हा त्याने नंदाची ही योजना ऐकली तेव्हा असे ठरविले की, आपणच अगोदर जावयाचे. तसे झाले म्हणजे आपण आनंदाच्या आधीच वेगवेगळया शहरांना पोहोचूं आणि त्याच्या अगोदरच मालहि विकून दाखवूं. त्यानंतर आनंदाचा काफिलाही त्याच ठिकाणी यईल, पण तोवर लोकांपाशी त्याचा माल विकत घेण्या-साठी पैसाच उरलेला नसेल. तसेच त्यांना जो काही माल हवा असेल तो त्यांनी त्याअगोदरच जीवक पासून खरेदी केलेला असेल.

असे ठरवून तो पाताळयंत्री जीवक आनंदाकडे गेला नि त्याला म्हणाला, "आपल्या दोघांचेहि तांडे जर बरोबर निघाले तर एकच गोंधळ उडेल, कारण या तांड्यांत एक हजार बैलगाडया असतील आणि त्यांच्याबरोबर व्यापारी, गाडीवाले नि सेवक पण ! तेव्हां मला असे वाटते की मी अगोदर निघावं."

पण जीवकाच्या या बोलण्याने आनंद मुळीच फसला नाही. परंतु एक तर तो चांगला मलगा होता आणि दुसरं म्हणजे त्याने असा विचार केला की, हा जीवक माझा व्यापार बुडवायला निघाला आहे. तसं असेल तर मी त्याच्यानंतर कांही दिवसांनी जाईन त्यांतून जो अगोदर जाईल त्याला रस्ता मोकळा करून घ्यावा लागेल, विश्रांति घेण्याच्या जागा निश्चित कराव्या लागतील आणि पाणी पिण्यासाठी विहिरीहि खोदाव्या लागतील. असा विचार करून तो जीवकाला म्हणाला, "मित्रा तूं अगदी खुशाल माझ्या अगोदर जाऊ शकतोस!"



आपण आनंदाला कसे फसविले या खुषीत जीवक मग्न होता. नंतर तो आपला तांडा प्रवासाकरीता तयार करण्याच्या मागे लागला. पण पाचशे गाड्यांचा तांडा घेऊन दूरच्या प्रवासाला निघायचे म्हणजे सोपी का गोष्ट आहे ? त्यासाठी हजार गोष्टी कराव्या लागतात ! त्यामुळे अगदी निघण्याची वेळ आली तरीहि तेथे सारा गोंधळच होता. त्या काफिल्यांतल्या उंटांनी बैलांना धक्के दिले तर बैलांनी आणखी समोरच्यांना तुडविले. या गोंधळांत खुपच लोकांना इजा झाल्या. लहान मुलेहि त्यांतून सुटली नव्हती. मग त्या तांड्यांतले लोक जीवकालाच शिव्या-शाप देऊं लागले. धान्यांची पोती नीट शिवलेली नव्हती. त्यामुळे बैल-गाड्या प्रवासाला निघूं लागण्यापूर्वीच त्यांतले धान्य खाली सांडू लागले. तसेच ती पोती व्यवस्थित लादलेली नव्हती. त्यामुळे त्या बैलगाड्या कधी डावीकडे तर कधी उजवीकडे झुकूं लागल्या. त्यामुळे त्यांना त्या ओढता येईनात. पण अखेरीस कसाबसा तो काफिला पाटलिपुत्रहून रवाना झाला.




3—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/81



कित्येक आठवड्यानंतर त्या काफिल्यास वाळवंटांतून वाटचाल करावी लागली. अशा वेळी काफिल्याचा नेता जर कर्तबगार असेल तर तो काय करील ? तळपत्या सूर्याचा नि कडक उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून आपल्या तांड्यांतल्या लोकांना गाड्यांच्या सावलीतून चालायला सांगेल. प्रवास शक्यतो रात्रीच्याच वेळी केला जाईल. पाणी उगीचच इकडे तिकडे खर्च होऊ नये म्हणून त्याच्या वापरावर निर्बंध घालील. आता जीवक जरी चांगल्या व्यापारी कुळांतून आलेला असला तरी त्याने या साऱ्या व्यावहारिक बाबी समजावून घेण्याची कधीच फिकीर केली नाही. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. दिवसामागून दिवस गेले आणि त्याची माणसे आणि जनावरे थकून गेली; वैतागलीहि ! जोवर हे सारेच काफिले जेव्हा लांबवर पसरलेल्या स्पष्ट मैदानातून जात होते, गावांतून व शहरांतून मार्गक्रमण करीत होते, तोवर त्यांना फारसा धोका नव्हता. पण त्यानंतर मात्र ते जेव्हां जंगलांतून नि वाळवंटांमधून जाऊ लागले तेंव्हा त्यांना फार सावध राहावे लागले. कारण त्या भागांत लुटारूंचा वावर होता आणि ते काय करावयाचे ? तर जंगलांत लपून बसायचे, या पैसेवाल्या काफिल्यांना लुटण्याची संधी हेरीत, आणि कित्येक दिवस वाळवंट पार करून दमलेल्या या काफिल्यांवर एकदम हल्लाच चढवायचे. आता या काफिल्यांतहि बरेच लोक असावयाचे. त्यामुळे हे लुटारू जर संख्येने थोडे असतील तर ते त्यांच्यावर सरळ हल्ला चढविण्याऐवजी त्यांना फसवणुकीच्या किंवा भामटेगिरीच्या मार्गांनी लुटावयास बघत. त्या वाळवंटांत राहत असलेल्या अशाच एका लुटारूंच्या टोळीने आपल्या या जीवकाच्या काफिल्यावर हल्ला करावयाचे ठरविले.

हा जीवक वाळवंटांतून बरीच वाटचाल करीत नेहमीच्या मार्गाने चालला होता. त्या मार्गापासून कांही अंतरावर वाळूच्या टेकड्यांमागे एक अत्यंत छोटी अशी हरितभूमि म्हणजे झऱ्यांची जागा होती. वाळवंटांत अधूनमधून अशा जागा असतातच नि तिथे जमिनीतले झरे वर येऊन वाहत असल्याने थोडीफार हिरवळ व ओलावाहि तेथे असतो. वाळवंटांतून जाणारे काफिले नेहमी अशा जागांच्या शोधांत असतातच. कारण तिथे त्यांना आपल्या माणसांना नि जनावरांना पाणी पाजून थोडी-फार विश्रांतीहि देता येते. जीवक ज्या वाळवंटांतून जात होता तिथल्या एका तळयांत थोडीफार कमळें होती. त्या लुटारुंच्या म्होरक्याने काय केले ? तर आपल्या टोळीतल्या दहा लोकांच्या मदतीने त्या तळयांतला ओला चिखल आपल्या घोड्यांना लावला. त्या दहा जणांच्या केसांत आणि कपड्यांना छोटी छोटी कमळे लावली. नंतर ते सारे घोड्यांवर बसून आपल्या जीवकाच्या काफिल्यास भेटायला निघाले.





लुटारुंचा प्रमुख जीवकास म्हणाला, "मी आणि माझ्याबरोबरचे हे लोक सर्व या देशाच्या राजाचे दूत आहोत नि राजेसाहेबांनी आम्हाला या सीमेवर खास कामगीरीवर पाठवलं आहे." त्या माणसांच्या घोडयांवरले ओल्या चिखलाचे डाग व त्यांच्या कपडयांवरली कमलपुष्पें पाहून जीवक चकित झाला. तिथून जवळपास एखादे तळे आहे काय, असे त्याने त्या टोळी प्रमुखाला विचारले असतां, पाहिजे असलेली संधी आयतीच मिळत असलेली पाहून तो खुष झाला.

तो म्हणाला, "तळी म्हणतां ? अर्थातच आहेत." त्याने नेमके ते तळे ज्या बाजूस होते त्याच्या नेमक्या विरूद्ध दिशेस बोट दाखविले आणि सांगितले, "तुम्ही त्या दिशेनं चालायला लागा आणि तुम्हाला त्या भूभागांत तळीच तळी आढळतील. त्या भागांत वाळवंट आहे खरे, पण गेल्या काही वर्षापासून तिथे पाऊस पडत आहे नि त्यामुळे ती पूर्वीची कोरडी तळी आता पाण्याने तुडुंब भरलेली आहेत. तुमच्या जवळच्या भांडयांतून जे काही पाणी तुम्ही भरुन ठेवले आहे, ते आता खराब झालं असेल, त्याला वास येत असेल, तुमच्या गाडयांचे बैलहि हे सारं ओझे वाहून दमलेले असतील. तेव्हा तुमच्या जवळचं हे सगळं वाशेळं पाणी फेकून द्या आणि तेवढं ओझं कमी झालं की तुम्ही जास्त वेगानं जाऊं शकाल. तुम्ही लवकरच या जागी परत याल नि तुमच्या जवळची भांडी ताज्या गोड पाण्यानं भरून घेऊं शकाल."

जीवक तसा मूर्ख तर होताच पण भोळाहि होता. त्याने आपल्या माणसांना जवळच्या सगळया भांडयांतले पाणी ओतून टाकण्याचा हुकूम दिला. नंतर तो आणि त्याच्याबरोबरचा काफिला, त्या लुटारूंच्या पुढाऱ्याने दाखवलेल्या दिशेने रवाना झाले. पण तिथे काय होते ? रेताड, वैराण नि जास्तच जास्त दूर पसरत गेलेले वाळवंट ! ते शेकडो योजन तरी पसरलेले असावे. थोडयाच दिवसांत त्याच्या काफिल्यांतली बरीच माणसे तहानेने व्याकूळ होऊन मरण पावली. लुटारू त्यांच्या मार्गावर होतेच. त्यांनी या साऱ्या काफिल्यांवर हल्ला केला, आणि त्यांच्यापेक्षा त्या व्यापाऱ्यांची संख्या जास्त असूनही, अशक्तपणामुळे ते लुटारुंशी लढू शकले नाहीत. अनेक व्यापारी मारले गेले. जीवक आणि त्याच्या बरोबरचे थोडेसे लोक कसेबसे जीवानिशी निसटले. पण आता त्यांना रिक्त हस्तांनी परत जाण्याची शरम वाटू लागली. मग ते इतर प्रदेशांत गेले. वाटेंत भीक मागून कशीबशी वाटचाल करू लागले किंवा अत्यंत अल्प रोजीवर मोलमजुरी करायला लागले.

जीवकाचा काफिला व्यापारासाठी निघून काही महिने झाले आणि आनंदला वाटू लागले की आता आपलीहि व्यापाराकरीता निघण्याची वेळ आली आहे. त्याचा आत्मविश्वास तसाच जबर होता. पण तो सुज्ञ असल्याने त्याला एक गोष्ट पक्की माहित होती. ती म्हणजे, जर दूरवरच्या मुलुखांत काफिले घेऊन जावयाचे असतील तर त्याबाबतच्या शेकडो गोष्टी केवळ तिथे जाऊन आलेल्या अनुभवी लोकांकडुनच समजावून घ्याव्या लागतील. जीवक कमालीचा मूर्ख होता. पोकळ डौल त्याच्याजवळ होता नि त्याखेरीज आपण सारे प्रश्न सहज सोडवू शकू असा गैरसमजहि त्याने करून घेतला होता. या चुका आनंदच्या हातून मात्र घडल्या नाहीत.





4—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/81

ज्या व्यापाऱ्यांनी अनेक वेळा व्यापारार्थ आपले काफले परदेशी नेऊन आणले होते, अशा वृद्ध, अनुभवी लोकांच्या त्याने गाठी घेतल्या. या व्यापाऱ्यांत काहीजण तर निरनिराळ्या मार्गांनी आपल्या काफिल्यासकट व्यापार करून आले होते. या तरुणाची नम्रता पाहुन ते सारे खुष झाले नि त्यांनी आपल्याजवळची सगळी माहिती त्याला मोठ्या आनंदाने दिली.

त्यांच्याकडून आनंदला आणखीहि अशी माहिती समजली, की, काफिल्यांच्या नेत्यास—किंवा त्या काळच्या भाषेत सांगायचे तर सार्थवाहास––आपली जबाबदारी फार गंभीरपणे पार पाडावयाची असते. 'सार्थ' या शब्दाचा अर्थ होता, ज्यांनी आपला सारा पैसा व्यापारांत किंवा व्यवसायांत गुंतविला आहे असे लोक म्हणजे त्या लोकांचा समुदाय; तर या सार्थवाहावर आपल्या सर्व लोकांना, त्यांच्या सामानासकट दूरवर घेऊन जाण्याची, सर्व माल विकून टाकण्याची व त्या साऱ्यांना सुखरुप परत आणण्याची जबाबदारी होती. या काफिल्यांत सारे लोक एक-मेकाबरोबर असत. या लोकांनी आपापसांत भांडणे करू नयेत म्हणूनहि त्यास दक्ष राहावे लागे. रस्त्यांत अनेक धोके, कित्येक अडचणी असत आणि आपल्या समुदायांनी कोणासहि कसलाहि त्रास होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागे. तेव्हा कोणतीहि अनिष्ट गोष्ट घडू नये म्हणून प्रत्येक बाबीवर तपशीलवार देखरेख करण्याचे आनंदने पक्के ठरवून टाकले.

बैलगाड्यांतून, उंटांवरून, खेचरांवरून आणि घोड्यांवरून व्यापारी यायला सुरवात झाली. या बैलगाड्यांना दोन चाके होती व त्या प्रत्येक चाकांत चार आरे होते. यापैकी कांही बैलगाड्यांत ज्यादा धान्याची पोती आणि इतर माल भरलेला होता त्यांच्या प्रत्येक चाकांत सहा आरे होते. आनंदने त्या बैलगाड्यांच्या चाकांवर लोखंडी धावा बसविल्या आणि त्या बैलगाड्या जास्तच मजबूत केल्या. यापैकी बहुतेक गाड्यांची मधली बसण्याची जागा अक्षांवर बसविली होती आणि त्यांना लाकडी प्लग व धातूच्या पिना यांची जोड दिली होती. आनंदने यांतल्या काही गाड्यांवरील बसण्याच्या जागांचा अक्षांशी बळकट चामडी पट्ट्याने संबंध जोडला. त्यामुळे त्यांना रस्त्यांवरच्या खांच खळग्यांचे धक्के कमी बसत. आनंदने आणखी एका गोष्टीचा विचार केला. ती म्हणजे, या काफिल्यांतील इतक्या प्रचंड लोकापैकी निदान कांही तरी वाटेत आजारी पडणारच. तेव्हा त्या आजारी लोकांना वाहून न्यायला या सुधारलेल्या बैलगाड्या जास्तच आरामदायी ठरतील!

या काफिल्यातल्या एका माणसाजवळ जरूरीपेक्षा जरा जास्तीच पैसे होते. त्याला काफिल्याबरोबर जातांना हत्तीवर आरूढ व्हायचे होते. आनंदने त्यास सांगितले की, राजे लोक जेव्हा लढाईवर जातात तेव्हा त्यांनी हत्तीवर बसणे ठीक असते; कारण त्यावेळी बरोबरच्या सैनिकांना त्या हत्तीच्या खाण्या-पिण्याची नि इतरहि प्रकारची काळजी घेता येते. पण अशा काफिल्याबरोबर जातांना असला देखावा करणे म्हणजे नसते संकट ओढवून घेण्यासारखे आहे. तसेच सुपीक मैदानांतून आणि जंगलांतून जातांना हत्ती फारसा त्रास देणार नाहीत. पण वाळवंटे ओलांडतांना मात्र या महाकाय प्राण्यांना लागणारे अन्न बरोबर न्यावयाचे म्हणजे नसत्या अडचणीच उत्पन्न करणे आहे. त्यापेक्षा आपल्या काफिल्यांत थोडेफार बकरे असल्यास जास्त चांगले ठरेल. एका सार्थवाहाने आनंदला असे सांगितले होते की, या मार्गात

काही डोंगराळ भागहि आहेत आणि तिथे छोटयाच पण श्रीमंत वस्त्या आहेत. पण तिथे जायचे झाल्यास मुख्य मार्ग सोडून छोटया पाऊलवाटांनी वर जावे लागेल. बैलगाडया तिथे नक्कीच जाऊ शकणार नाहीत. त्यापेक्षा आपल्या काफल्यांत थोडेसे बकरे असले तर त्यांच्या पाठीवर थोडासा माल भरून या उंचावरील गावा-शहरांत पोहोचता येईल. बकऱ्यांना असे भाग चढता येतात. आणि आनंदची ही कल्पना खरोखरीच फारच चांगली असल्याचे मागाहून सिद्ध झाले.

वजनांत हलका पण अधिक किंमतीचा माल आपल्याबरोबर नेणे व्यापाऱ्यांना साहजिकच जास्त पसंत होते. उत्कृष्ट दर्ज्याच्या, वजनांत हलक्या व रंगबिरंगी छपाई केलेल्या कापडास सर्वप्रथम प्राधान्य दिले जाई. कारण हा माल व्यापाऱ्यांच्या सर्वांत आवडीचा होता. बल्खच्या पलीकडील तीन रस्त्यांपैकी एक रस्ता थेट चीनला जात असे हे तुम्हाला या अगोदर सांगितलेच आहे. या रस्त्यावर अजुनहि अनेक बौद्ध मंदिरांचे व मठांचे अवशेष सापडतात आणि संशोधकांना तर या उद्ध्वस्त अवशेषांत भारतीय बनावटीच्या छापील कापडाचे तुकडेहि मिळाले आहेत. मूल्यवान् रत्ने, चंदनाचे लाकूड आणि सुगंधी द्रव्ये यांनाहि या व्यापारी तांडयांकडून कापडाखालोखाल पसंती दिली जाई. याचे कारण, या मालाला जागा कमी लागे, तो वजनांत हलका असे नि त्याला त्या मानाने किंमत मात्र खूपच मिळे. रंगीत कापड कापून, त्याच्या घडया करून अनेक पाकळया असलेल्या फुलाच्या आकारांत ताणले व विणले जाई नि त्याला खरोखरीच्याच फुलांचा सुवासहि दिला जाई—नंतर ते सुकविण्यांत येई. ही विविध कापडें वा फुलें खरोखरीचीच भासत व त्यांचा सुगंध कित्येक आठवडे टिकून राहत असे. रोमच्या श्रीमंत स्त्रियांना–श्रीमतीजींना–या सुगंधित पुष्पसदृश्य कापडाचा फार शौक असे व त्याची कितीहि किंमत द्यावी लागली तरी त्या फिकीर करीत नसत. याचे कारण कापडास फुलाचा आकार देणे त्यांना अवघड नसले तरी त्यांस ज्या सुगंधाची जोड द्यावयाची, ती सुगंधी द्रव्ये मात्र भारताखेरीज इतरत्र मिळत नसत. आपल्या केसांत अशी फुलें माळलेल्या कांबोजमधील एका स्त्रीची शिल्पकृति आजहि मथुरेच्या संग्रहालयांत पाहावयास मिळते. 'कांबोज' हे आजच्या ताजिकीस्तान या भूभागाचे प्राचीन नांव असून हा भाग सध्या रशियाचा हिस्सा आहे. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी उत्तर भारतावर राज्य केलेल्या कुशान सम्राटांच्या आधिपत्याखाली म्हणजे कुशान साम्राज्याच्या अधिकाराखाली हा भाग त्यावेळी मोडत होता.

आनंद दूरवरच्या प्रदेशांना जाण्याची तयारी करीत आहे, ही बातमी जेव्हा सर्वत्र पसरली, तेव्हा दोन मुलगे त्यास भेटायला आले. त्यांची वये वीस वर्षांपेक्षा जास्त नसावीत. ते ज्या कुळांत जन्माला आले होते त्यांचे वैशिष्टय म्हणजे प्रत्येक पिढीत त्याने विद्वान् माणसेच जन्मास घातली होती. त्या मुलांना या काफिल्यांत सामील होऊन आनंदबरोबर तक्षशिलेपर्यंत जाण्याची इच्छा होती व त्यासाठीच ते आनंदची संमति घ्यायला आले होते. सध्या ही तक्षशीला नगरी पाकिस्तानांतील पठाणांच्या भूमीत आहे. पण प्राचीन काळी ते एक विद्यापीठ होते. नि तेथे बौद्धमताचे, त्याचप्रमाणे इतरहि अभ्यासाचे पाठ दिले जात.

आनंदने त्यांना विचारले, "इथे मगधांतच विक्रमशीला विद्यापीठ आहेच ! मग तुम्हाला तक्षशीलेस कशाला जायला हवं ?"

त्या मुलांनी सांगितले, "आम्हाला सर्व वनस्पतींचा अभ्यास करावयाचा आहे. या वनस्पतींमुळेच माणसांना जगणं आणि काम करणं शक्य होतं. अन्नधान्याशिवाय नि फळां खेरीज आपण काय करू शकू ? आपली जनावरं कशी जगतील ? आम्ही असं ऐकलं आहे की, तक्षशीला हेच सर्वोत्कृष्ट वनस्पतिशास्त्र शिकण्याचं स्थान आहे. तिथले महान् आचार्य–गुरुवर्य आत्रेय विद्यार्थ्यांनाच वनस्पति गोळा करायला, त्यांच्या जाति ओळखायला, तसेच त्या विद्यापीठ-ग्रामाच्या पंचक्रोशींत आढळणाऱ्या साऱ्या वनस्पतींच्या गुणधर्माचं वर्णन करायला सांगत असतात. ती खरीखुरी कडक परीक्षा असते. पण आम्हाला हवं आहे ते अशाच प्रकारचं प्रशिक्षण." त्या दोघांचा उत्साह पाहून आनंदला फार समाधान वाटले. त्याने त्या दोघांनाहि आपणासमवेत येण्यास संमति दिली.



मनोरंजनाचे कार्यक्रम करणाऱ्या एका कलाकार समूहासहि या काफिल्याबरोबर यावयाचे होते. त्यांत नर्तक, गायक, जादुगार व नकलाकार यांचा समावेश होता. अनेक व्यापाऱ्यांना वाटत होते की, हे लोक म्हणजे मार्गात नसता उपद्रव ठरतील. पण आनंद म्हणाला, "त्यांना यायचं असेल तर येऊं द्या ! डोंगराळ आणि वाळवंटी भागांतून दिवसभर वाटचाल केल्यावर संध्याकाळी आपण जेव्हा दमून बसलेलो असूं तेव्हा हे लोक आपली चांगली करमणूक करतील. तसेच आपण जेव्हा छोटया शहरांना पोहोचूं तेव्हा आपल्या काफिल्यास नगराबाहेरच मुक्काम ठोकावा लागेल, कारण या पांचशे गाडया जर तेथल्या लहानश्या रस्त्यांवरून जाऊ लागल्या तर कमालीचा गोंगाट उत्पन्न होईल. पण जेव्हा आपला काफिला विश्रांतीसाठी त्या छोटया शहराबाहेर थांबेल, तेव्हा हे लोक त्या शहराच्या बाजारपेठा आणि मंदिरे या ठिकाणी जातील आणि स्वतःची कला दाखवून त्या नृत्य-गायनावर पैसे कमवून आणतील. नंतर त्या लोकांना समजेल की, दूरवरच्या ठिकाणांहून कांही परके लोक आले आहेत नि ते, कुतुहलापोटी आपण जिथे थांबलेलो असू, तिथे येतील. आपण या कलावंतांच्या समूहासहि लोकांना असे सांगायला सांगू की, आपण लोक दूरवरून तेथे आलो आहोत नि आपण आपल्याबरोबर अनेक स्वस्त पण चांगल्या जिनसाहि विकण्यासाठी आणल्या आहेत."

तथापि, विक्रम नावाच्या एका माणसाबाबत मात्र आनंद बुचकळयांत पडला होता. त्यालाहि या काफिल्याबरोबर यायचे होते पण कशासाठी याचे कारण मात्र तो स्पष्टपणे सांगत नव्हता. बरे, त्याच्याबरोबर विकण्यासाठी मालहि नव्हता. खरं म्हणजे, त्याला पैसे मिळविण्यांतही आस्था दिसत नव्हती. अखेरीस त्याच्या बोलण्यांतून इतकेच सिद्ध झाले की, प्रवासाच्या अद्‌भुततेसाठी निरनिराळे देश आणि लोक पाहण्याकरीता नि त्यांची विविध प्रकारची राहणी पाहण्याकरीता, त्यास काफिल्याबरोबर यावयाचे होते. इतर व्यापारी त्यास बरोबर न्यावयास उत्सुक नव्हते, पण आनंदने मोठ्या मुष्किलीने त्यांचे मन वळविले. पण तो विक्रम मात्र खरो-खरीच चांगला साथी असल्याचे नंतर आढळून आले. जेव्हा केव्हा छोटासा प्रश्न निर्माण होई, तेव्हा तो उपयुक्त सूचना देई. या काफिल्याचा तळ जेव्हा एखाद्या अरण्यापाशी पडे तेव्हा हा विक्रम कुठेतरी जणू अदृश्यच होत असे आणि थोडया वेळाने जंगली फळे घेऊन येत असे. ती फळे चवीला तर चांगली असतच पण त्यांची मूळें देखील आगीवर भाजून मागाहून खाता येत असत.

आनंदने आणखी एक गोष्ट केली. ती म्हणजे, ज्या कोणा बौद्ध भिक्षूस आपल्या काफिल्या-बरोबर दूरवरच्या देशांत गौतम बुद्धांचा संदेश पसरविण्यासाठी यावयाचे असेल, त्यास मोठ्या खुशीने तसे येऊ दिले जाईल. असे मत त्याने बोलून दाखविलें. भगवान् बुद्धांनी काय सांगितले होते ? हेच की, प्रत्येकाने जर दुसऱ्याशी सौजन्याने आणि प्रेमाने वागावयाचे ठरविले तर हे मानवी जीवन अधिकच सुसह्य आणि आनंदाचे होईल. काफिल्यांत एखादा बौद्धभिक्षु असणे एरवीदेखील चांगलेच ठरेल. असेहि आनंदला वाटत होते, कारण इतक्या लोकांना बरोबर घेऊन प्रवास करावयाचा ; म्हणजे वाटेत अडचणी येणार नि हमरीतुमरी व भांडणे होण्याची शक्यताहि नाकारता येत नव्हती. आणि अशा प्रकारे बुद्धदास नामक त्या भिक्षूचा या काफिल्यांत



5—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/८१



समावेश झाला. त्याने त्या अगोदर अनेक प्रवाश्यांच्या तोंडून या बल्ख देशांविषयीच्या कथा ऐकल्या होत्या नि त्यामुळे त्याला ती भूमि पाहण्याची अतोनात इच्छा होती.

पाटलिपुत्राहून रवाना झाल्यानंतर कांही आठवडयांनी त्या काफिल्यास, आपल्या बैलांना आणि उंटांना विश्रांति देण्यासाठीं, तसेच, काही गाडयांची दुरुस्ती करण्याकरीता दोन-तीन दिवस मुक्काम करावा लागला, योगायोगाने हे सारे लोक ज्या ठिकाणी थांबले ते रमणीय आणि नदीकांठी बसलेले होते. रस्ताहि त्या नदीच्या कांठानेच जात होता. नदीपलीकडे घनदाट जंगल पसरलले होते. नदीच्या या बाजूला अनेक गांवे वसलेली होती, अर्थात, ती नदीपासून थोडया अंतरावर वसलेली होती, पण पलीकडल्या जंगलांत राहणाऱ्या आदिवासी टोळया रानटी निश्चितच नव्हत्या. त्यांचा या गांवांतील लोकांशी व्यापार चालत असे, त्यांना बांबू, जळाऊ लाकूड, मध, औषधी वनस्पति इत्यादि जंगली उत्पादने विकून त्या बदल्यांत धान्ये व कापड हे लोक घेत असत.

एका तरुण आदिवासीने नदीवर नौका वापरायला सुरवात केली होती. बहुधा आदिवासीच ही नौका वापरीत असत. परंतु उलट फेरीतही त्या छोटया गावांतील व्यापारी लोक, त्या नावेंतून जंगलांत जात असत व तेथेच त्या आदिवासीकडून सामान खरेदी करीत असत. वाहतुकी-चा खर्च आकारला जात नसल्याने त्यांना तो माल स्वस्त मिळे. ही नौका चालविणारा तो तरुण सरळ आणि चांगल्या स्वभावाचा होता. बऱ्याच वेळा त्या गावांतील लोक आधी भाडे न देता नावेवर चढत आणि पैलतीरावर पोहोचल्यानंतर पैसे देऊ म्हणून सांगत. अर्थात् ही त्यांची लबाडीच होती. कारण काठावर पोहोचल्यावर ते पैसे न देता सरळ चालूं लागत.

आनंदने हा प्रकार ब-याच वेळा पाहिला. नंतर त्याने त्या नाविकाला आपल्यापाशी बोलाविले व सांगितले, "जे लोक तुझ्याच वस्तीतले आहेत, त्यांच्याकडून तू नदी ओलांडल्यावर किंवा मागाहून पैसे घेतलेस तरी चालतील. कारण ते लोक साधे, प्रामाणिक आहेत नि तुला फसविणार नाहीत. पण या गांवांतले लोक मात्र फारसे प्रामाणिक दिसत नाहीत. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे नदी ओलांडण्यापूर्वी नि नंतर लोकांची मन:स्थिति वेगवेगळी असते. नदी ओलांडण्यापूर्वी त्यांना नदी ओलांडण्याची उत्कट इच्छा असते. नदीतीरावर पोहोचल्यावर नंतर त्यांना खरेदीची किंवा घरी जाण्याची घाई असते. तेव्हा जेव्हा हे लोक नौकेवर चढणार असतील किंवा चढले असतील तेव्हाच त्यांच्यापासून भाडे वसूल करीत जा."



तो मुलगा त्याप्रमाणे वागू लागला आणि प्रत्येक खेपेस आपल्याला सुमारे दुप्पट पैसे मिळत असल्याचे त्याला आढळून आले. त्याला इतका आनंद झाला की आपणही आनंदसाठी कांही तरी करावे असे त्याला वाटायला लागले. तो आनंदकडे आला आणि त्याने त्याला सांगितले की, हत्तींचे सुळे गोळा करणाऱ्या एका आदिवासीची आपल्याला माहिती आहे. पण तो माणूस प्रत्येकाला मात्र ते सुळे विकत नसतो. सहा महिन्यांतून एखादे वेळी, मथुरेचा एक व्यापारी बरोबर सारे हस्तिदंत घेऊन आला नि त्याने भरपूर नफा घेऊन तो सर्व माल तेथील हस्तिदंत कारागिरांना विकला.

त्या मुलाने आनंदला सांगितले, की त्याला त्या आदिवासीकडे घेऊन जाण्याची आपली तयारी आहे.



आनंदला अशीही माहिती मिळाली होती की, दूरवरच्या देशांतील लोकांना भारतीय हस्तिदंताचे कोरीव काम फार आवडत होते. पण त्यांना मूळ हस्तिदंतहि असंस्कारित स्वरूपांत हवा होता. आणि त्यावर आपल्या देशांतल्या कारागिरांनी मेहनत करुन कोरीव काम करावे, अशी त्यांची इच्छा होती; आणि ही माहिती खरीच होती. युरोपमधील पूर्व भागास त्यावेळी सुरवातीला, 'ईस्टर्न रोमन एम्पायर (पूर्वेकडील रोमन साम्राज्य)' आणि त्यानंतर "बिझंटाइन एम्पायर (बिझंटाइन साम्राज्य)" असे नांव होते. तेथील लोकांना हस्तिदंत हवा होता. कशा-साठी ? तर सिंहासनावरील कोरीव नक्षीकामाकरीता, पडद्यांसाठी तसेच, जीसस ख्राइस्ट (येशु ख्रिस्त) यांच्या जीवनावर आधारलेल्या कोरीव चित्रांसाठी, त्याचप्रमाणे, ख्रिस्ती संतांच्या जीवनकथांतील चित्रित प्रसंग सुशोभित करण्याकरीता ! या सुळ्यांसाठी व हस्तिदंतांसाठी लागेल ती भरपूर किंमत देण्याची त्यांची तयारी होती. त्या आदिवासीची आनंदबरोबर व्यवहार करण्याची सुरवातीस इच्छा होती. पण मथुरेचा तो व्यापारी रास्त किंमत देण्यास तयार नसल्याचे आनंदला आढळून आले म्हणून जेव्हा आनंदने बरीच जास्त किंमत देण्याची तयारी दाखविली, तेव्हां त्या आदिवासीने आनंदला प्रचंड प्रमाणांत हस्तिदंत तर दिलाच, शिवाय, त्यापुढेहि आनंदलाच सर्वात प्रथम हस्तिदंत विकत देण्याचे आश्वासन दिले.

सुरवातीसच अशी भाग्यशाली घटना घडल्याने आनंदला असे वाटू लागले की आपण आपल्या बरोबर कोरीव हस्तिदंताचे नमूने परदेशी न्यावे. त्यामुळे मथुरेस पोहचल्यावर, हस्तिदंतावर कोरीव काम करणाऱ्या कारागिरांच्या दुकानांना व निवासस्थानांना त्याने भेट दिली. तिथे त्याला अनेक कोरीव चित्रे आढळली. त्यांवर, आकर्षक वस्त्रे व अलंकार परिधान केलेल्या सुंदर भारतीय स्त्रियांचे चित्रण केलेले होते. त्याने तेथे बरीच खरेदी केली. बरे ती शिल्पेही अशी होती, की ती बांधून घेण्यांत वा घेऊन जाण्यांत कोणताच त्रास झाला नाही, कारण ती वजनांतहि हलकी होती.

या काफिल्याचा असा प्रवास बरेच आठवडे चालला होता. अशी वाटचाल करता करता दाट लोकवस्तीचे प्रदेश, गांवें, शहरे मागे पडली व आता अरण्य भाग दृष्टीस पडू लागला. त्या जंगली भागांत प्रवेश करतांच व्यवस्थित मार्ग अदृश्य झाले आणि मुख्य मार्ग सोडून आजूबाजच्या गावांना भेट द्यावयाची झाल्यास, त्या थोड्याश्याच अंतरावरहि जाण्यासाठी डाव्या किंवा उजव्या बाजूच्या प्रदेशास भेट देण्याकरीता, या काफिल्याला तात्पुरत्या स्वरूपांच स्वतःपुरते रस्ते बांधणे भाग पडले. आनंदने आपल्या काफिल्यांतले पांच-सहा सशक्त तरूण निवडले. त्यांना चांगलेसे घोडे दिले आणि त्यांना आपल्या काफिल्याच्या मुक्कामाच्या एक दिवस अगोदरच पुढे पाठविले. पुढला मार्ग कसा आहे, ते त्यांनी नीट पाहावयचे होते व त्याप्रमाणे परतून आनंदला तसे सांगायचे होते. तसे करून ते दुसऱ्या दिवशी परतहि आले. समोरचा मार्ग, खडकाळ, वाळवंटी, नाल्यांनी भरलेला असा नसेल तर, त्या काफिल्याने पुढे जावे, असे ठरले. कधीकधी त्या अग्रगामी म्हणजे पुढे जाणाऱ्या पथकाला, पुढला मार्ग निबिड जंगलांनी किंवा थोड्या फार रानाने वेढलेला आढळला, परंतु त्या दुर्गम भागापुढील गावे, शहरे जर संपन्न असतील, तेथे जाऊन जर काही फायदा होणार असेल तर, सुमारे ५० तरूणांचे पथक समोर पाटविले जाई. जंगलांत आडवी येणारी, झुडपे कापून मार्ग मोकळा करणे, वाटेतले पत्थर वा अवजड धोंडे हलविणे खांचखळगे बुजविणे ही कामे या पथकास करावयाची असत. आजुबाजूस नुसतेच माळरान पसरलेले असेल तर या पथकास तेथे वणवा लावून मार्ग मोकळा करणे सुकर होई. अशा रीतीने, या काफिल्यास अग्निदेवाची चांगलीच मदत झाली नि त्यामुळे त्या काफिल्यांतील सारे व्यापारी मणिभद्र देवाची प्रार्थना करीत. प्राचीन काळांतील व्यापाऱ्यांची ती इष्टदेवता मानली जाई !

प्रत्येक दिवशी, रात्रीच्या मुक्कामासाठीची जागा अत्यंत काळजीपूर्वक निवडावी लागे. घनदाट जंगले असलेल्या भागांत रात्रीच्या वस्तीसाठी आनंदने जी जागा निवडली ती, त्या जंगलांच्या अखेरीपासून (ती, जंगले जेथे संपली होती, त्या जागेपासून) कांहीशी दूर अंतरावर होती. खरे म्हणजे, ते मोकळे मैदानच होते, आनंदला हे पक्के माहित होते की, त्या जंगलांत दरोडेखोर आणि हिंस्त्र श्वापदे असणार आणि काफिल्याचा मुक्काम जर त्या जंगलांपासून जवळच पडला तर रात्रीच्या अंधारांत दरोडेखोर व वन्य पशु, विश्रांति घेत असलेल्या प्रवाश्यांवर हल्ला चढविणार. तेव्हां जर काफिल्याच्या मुक्कामाची जागा जंगलांपासन काहीशी



6—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/81



दूरवर असेल तर त्या हल्लेखोर दरोडेखोरांच्या व जनावरांच्या आगमनाची चाहूल, मैदाने ओलांडतांना झालेल्या आवाजाने सहज लागेल. तेव्हां त्याने जंगले संपलेल्या जागेपासून दूर अंतरावर काफिल्याचा रात्रीसाठी मुक्काम ठोकतांना, आपल्या नोकरांकरवी अग्नि पेटविला व रात्रभर पहारा करण्यासाठीं कांही तरुणांच्या गटांची निवड केली. त्या गटांनी पाळीपाळीने आपले काम उरकावयाचे होते.

आणि अशाच एका रात्री काफिल्याचा मुक्काम तशाच एका ठिकाणी पडलेला असतांना, ती दुर्दैवी घटना घडलीच ! बाळांनो! मी तुम्हाला या अगोदरच सांगितले आहे की, प्रवासाच्या हौशीमुळे नि निरनिराळे प्रदेश पाहण्याचा उत्सुकतेने विक्रम त्या काफिल्यांत सामील झालेला होता ! त्याची एक सवय म्हणजे, रोज जंगलांत जावयाचे आणि तेथून लोकांच्या खाण्याकरीता फळे व बोरेही घेऊन यावयाचे. एकदा काय झाले ? त्याच्याबरोबरचे दोन मित्र त्या जंगलात विक्रमपासून आणखीही आंत दूरवर गेले आणि तिथे त्यांनी काही रानटी फळें खाल्ली, ती त्यांनी त्यापूर्वी कधी पाहिलेली नव्हती, पण काय असेल ते असो, त्यांचा रंग, वास, रूप सारेच काही पाहणाऱ्याची भूक वाढविणारे होते. पण मुळांत ती फळे विषारी होती आणि ती खाऊन ते सगळे आजारी पडले. त्या काफिल्याजवळ, नेहमीच्या आजारांवर नि दुखण्यांवर

उपचार करण्यासाठी काही औषधे सतत तयार असतच. पण ही विषारी फळे खाल्यानंतर त्यावर कोणते औषध द्यावयाचे ते मात्र कोणालाच माहित नव्हते. तथापि, विक्रम मात्र त्यांच्या मदतीला धावला. त्याने थेट जंगलातच मजल मारली आणि तेथून काही औषधी वनस्पतींची पाने बरोबर आणली. त्याने नंतर ती पाने कुटून त्यांचा रस काढला व तो त्या आजारी युवकांना पाजला. थोड्यांच वेळांत त्यांना बरेहि वाटू लागले. आनंद मात्र यापासून एक धडा शिकला. कोणीही जंगलांत आतवर जाऊ नये व दिसतील ती अपरिचित फळे खाऊ नयेत, अशी कडक ताकीद त्याने साऱ्यांना दिली.

जेव्हा जेव्हा म्हणून त्या काफिल्याचा रात्री मुक्काम पडे तेव्हा तेव्हा आनंद त्या साऱ्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी किती वाजता निघावयाचे व संध्याकाळपर्यंत किती अंतर तोडावयाचे याची कल्पना देत असे. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशींच्या पहाटे, प्रस्थानापूर्वी अडीच घटका (एक तास) अगोदर मोठमोठ्याने ढोल वाजवून संपूर्ण काफिल्यास जागे करण्यांत येई. तसेच प्रवास प्रयाणाच्या वेळेहि मोठमोठ्याने ढोल वाजविला जाई. मध्यंतरी मुक्काम ठोकला असता तो आवरून पुढे निघण्याच्या वेळीही हाच म्हणजे ढोल वाजविण्याचा क्रम चालू राहत असे.




काफिल्यास वाळवंटांतूनहि वाटचाल करावी लागे. ही वाळवंटे दुपारच्या वेळीं अत्यंत तापलेली असत. हा फरक लक्ष्यांत घेऊन आनंदने असा निर्णय घेतला की, यापुढे वाळवंट संपेपर्यंतचा प्रवास रात्रीच करावयाचा. त्यानुसार या काफिल्याचा प्रवास दर दिवशीं—नव्हे दर रात्री—चालू राही व तो सकाळी ९ वाजे पर्यंत पुरा होई. तोपर्यंत ऊन्ह चांगलेच तापलेले असे. नंतर गाड्या थांबत व त्यांची रचना मंडलाकार केली जाई. त्या गाड्या गोलाकार उभ्या केल्यामुळे त्यांची जी सावली पडे तीत जनावरांना विश्रांतीसाठी बसविले जाई. वाळूचा एक गुणधर्म म्हणजे ती दिवसा जितकी लवकर तापते तितकीच रात्री झपाट्याने थंड होते. म्हणून त्या काफिल्याचे रात्रीचे जेवण जरा लवकरच म्हणजे संध्याकाळी सूर्यास्तापूर्वीच होई व तो पुढे प्रवासास निघे. संपूर्ण रात्री व दुसऱ्या दिवशींच्या पहाटे त्याचा प्रवास चालू राही; अर्थात् अधून मधून विसावा घेऊनच !

आता या काफिल्यास दिशा कशा समजत होत्या, कोणत्या मार्गाने जावयाचे विशेषत: चांदणे नसलेल्या आंधाऱ्या रात्री वाटचाल कशी करावयाची हे कसे उमजत होते? वद्य म्हणजे कृष्णपक्षातल्या रात्री ते ताऱ्यांच्या साहाय्याने मार्ग काढीत असत. खरे म्हणजे ही बाब वाटते तितकी कठिण नाही. तुम्हाला सुद्धा ते सहज जमू शकेल, पश्चिम दिशा कोणती, उत्तर दिशा कुठे हेहि ताऱ्यांचा अभ्यास करून सांगता येईल. एखाद्या स्वच्छ, निरभ्र अंधाऱ्या रात्री तुमच्या आईला किंवा बाबांना एखादा तेजस्वी (चकचकीत) तारा किंवा तारका पुंज (समुदाय) दाखवायला सांगा. उदाहरणार्थ, त्यांच्या मदतीने तुम्हाला ध्रुवाचा तारा किंवा सप्तर्षि सहज शोधून काढता येतील. सुरवातीस तुमच्या उजव्या आणि डाव्या हातांना कोणत्या दिशा आहेत हे निश्चित करून घ्या. तसेच, तुमच्या समोरच्या व मागच्या दिशा कोणत्या हेहि पक्के माहित करून घ्या नि मग या ध्रुवाचे किंवा सप्तर्षींचे दर्शन घ्या. ते फारसे बिकट ठरू नये; कारण तुम्हीं त्यावेळी अंगणांत किंवा गच्चीत उभे असणार आणि जेथे तुम्हीं उभे असाल तेथून आजु-बाजूच्या दिशा तुम्हाला ठाऊकच असणार. आता तुम्हीं एखाद्या अनोळखी ठिकाणी रात्रीच्या वेळेस गेला आहात, असे समजा. उदाहरणार्थ कोठे लहान मुलांच्या मेजवानीस किंवा शहराच्या इतर कोणत्या तरी भागांत, अथवा तुमच्या आजी-आजोबांकडे सुट्टीसाठी खेड्यांत गेला आहात, असे धरून चालू या !

त्यावेळी आकाशातल्या या ध्रुवताऱ्याकडे किंवा सप्तर्षीकडे पाहिलेत तर तुम्हाला आजूबाजूच्या दिशाही चटकन समजू शकतील !

तर तुम्हाला त्या काफिल्याची गोष्ट सांगत होतो नाही का ? तो एकदा असाच त्या उष्ण वाळवंटातून जात असताना काही तरी विपरीत घडले.


तें वाळवंट बरेंच मोठे असले तरी विचित्र किंवा अनोळखी मात्र नव्हते. त्या अगोदरहि व्यापाऱ्यांचे कित्येक तांडे वर्षानुवर्षें त्या रस्त्याने गेलेले होते. पण ह्यावेळी मात्र आपल्या आनंदच्या तांड्याचा बराचसा अमूल्य वेळ गाड्यांच्या दुरुस्तीवर खर्च झालेला होता. तसेच काही बैलही बरेच दमलेले होते नि त्यामुळे ते हळूहळू चालत होते. संपूर्ण तांड्यालाच बरोबर वाटचाल करावयाची असल्याने या दमलेल्या बैलांपायी तांड्यांचीहि गति मंदावलेली होती. त्यामुळे हे संपूर्ण वाळवंट ओलांडायला आनंदच्या तांड्याला अपेक्षेपेक्षा जास्तच वेळ लागला. त्याला आता काळजीही लागून राहिली होती. कारण पाण्याचा साठाहि कमीकमी होऊ लागला होता. वाळवंटांत वाटसरूला एखाद्या वेळी अन्न मिळाले नाही तरी चालू शकेल पण तो पाण्याशिवाय राहू शकणार नाही. पण अखेरीस तो तांडा जवळजवळ सगळे वाळवंट ओलांडून खडकाळ प्रदेशांत पोहोचला. हे एक सुचिह्नच होते. कारण, त्या ठिकाणापासून संपूर्ण वाळवंट पार करून त्यापलिकडील हिरव्यागार खोऱ्यांत प्रवेश करायला केवळ दोन दिवसाचा प्रवास पुरेसा होता.



विद्यार्थी ग्रंथालय
न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड,
पुणे ४११०३०



7—336 एम ऑफ आय एण्ड बी (एन. डी.)/81



या काफिल्याचा अग्रेसर किंवा ज्याला ताऱ्यांची चांगली माहिती असल्याने जो सर्वांच्या समोर चालत होता तो सेनीय नांवाचा माणूस होता. तसा तो म्हाताराच होता, पण त्याने त्या अगोदरच बऱ्याच काफिल्यांबरोबर प्रवास केलेला असल्यामुळे व त्याला ग्रहनक्षत्रांचीहि चांगली माहिती असल्याने, वाळवंट ओलांडण्यासाठी या काफिल्याचा समोर सर्वात अग्रभागी राहून मार्गदर्शन करण्यासाठी त्याची निवड करण्यांत आली होती. काफिल्याच्या सर्वात शिरोभागी असलेल्या गाडीत तो बसलेला होता नि त्या गाडीत फारसा माल भरलेला नव्हता. पण पिण्याच्या पाण्याची बहुतेक सारी भांडी याच काफिल्याच्या अखेरीस असलेल्या गाडीत भरली नि ती गाडी जर वाट चुकली तर संपूर्ण काफिल्यास अडचणींत पडावे लागले असते. पण सर्वात समोरची गाडी वाट चुकण्याचा प्रश्नच नव्हता. इतर गाड्या तिच्या मागून येतच होत्या आणि त्यातुनही जर काफिला वाट चुकलाच असता तरीही ते सारे बरोबरच राहिले असते नि पाण्याचा प्रश्न उद्‌भवला नसता !

आता सेनीय हा म्हातारा माणूस असल्याने ते वाळवंट ओलांडतांना तो इतरांपेक्षा जास्त थकला होता. त्यांतून विलंबहि बराच लागत होता. त्यामुळे तो काफिला त्या खडकाळ भागांत पोहोचला तेव्हां त्याला अतोनात आनंद झाला. संध्याकाळ झाली नि पुढील प्रवासास निघण्याची वेळ आली त्यावेळी हा वृद्ध स्वतःशीच विचार करू लागला "आता माझ्याजवळच्या बहुतेक साऱ्या भांड्यातले पाणी फेकून देऊन गाडीचे वजन कमी करीन, त्यानंतर गाडी जोरात चालवून वाळवंटाच्या सीमेवर दोन रात्रीऐवजी केवळ एकाच रात्रीचा प्रवास करुन पोहोचेन. पण या बाकीच्या गाड्या माझ्या बरोबरीने येऊ शकणार नाहीत, काही हरकत नाही. निदान

कांही गाड्या तरी फारशा मागे नसतील आणि इतर गाड्या त्या सहज पाहू शकतील. कारण ही चांदणी रात्र आहे त्यामुळे त्या माझ्या गाडीचा माग सहज काढू शकतील. मी फारच दमलो आहे नि माझे हृदयही दुबळे झालेले आहे. मला सर्वात अगोदर त्या हिरव्या खोऱ्यांत पोहोचणे जरूर आहे. त्यातूनहि या काफिल्यांतील बाकीच्या गाड्या फारच मागे पडल्या तर मी परत येऊ शकेन. जरूरी पडलीच तर मी वाटेतल्या ओढ्यांवरुन ताजे पाणीहि भरुन घेऊ शकेन. पण तशी वेळ येणारच नाही याची मला खात्री आहे सारे काहीं ठीक होईल."

पण दुर्दैवाने सर्वच काही विपरीत घडले. त्याने आपल्या जवळील बहुतेक सारी पाण्याची भांडी ओतून टाकून गाडीचे ओझे कमी केले, आणि तो रात्रीच्या प्रवासाकरीता आरामशीरपणे वाट पहात राहिला. आधीच्या कित्येक रात्री तो जागाच रहात होता, पण यावेळी तो तितकासा सावध नव्हता. त्यामुळे त्याला बसल्या जागीच डुलकी लागली.

परंतु गाडी चालूच राहिली आणि थोडा वेळ तरी कांहीच अनिष्ट घडले नाहीं. तथापि काहीं काळानंतर बैल वाटेतल्या अडथळयांवर चढले व त्या खडकांवर थबकून तेथेच उभे राहिले. रस्ता काढण्यासाठी ते थोडेसे डाव्या बाजूस कलले आणि हे दुर्दैवी प्रकार त्या रात्री बऱ्याच वेळा घडले; परिणामी, थोड्या अवधीनंतर तो अख्खा काफिला, कसा कोण जाणे, पण आल्या मार्गानेच मागे जाऊ लागला. उजाडले आणि लोकांना काय दिसले ? संपूर्ण रात्री प्रवास करूनहि ते सारे पूर्वीच्याच खडकाळ भागांत परत आले होते. त्यातच त्यांना आणखीहि एक गोष्ट समजली, ती म्हणजे सोनियाने आपल्या जवळचे बहुतेक सारे पाण्याचे घडे ओतून टाकले आहेत. तेव्हां तर ते आणखीनच निराश झाले. तो असह्य उष्ण दिवस सरण्या-पूर्वीच आपण सारी 'पाणी पाणी' करून मरणार याबद्दल त्यांची खात्री पटली. संकट किती गंभीर आहे याची आनंदला लगेच कल्पना आली. पाण्याखेरीज संपूर्ण तांडाच दोन दिवस देखील प्रवास करूं शकणार नाहीं, हे तर निश्चितच होते. फारशी आशा नसली तरीही जवळपास आणखी कोठे पाणी मिळूं शकेल काय, याचा तपास करण्याचीहि त्याची इच्छा होती. परंतु कैक कोस तेथे गरम वाळूशिवाय काहींच नव्हते. मध्येच हरितभूमि लागे, थोडीफार झाडेहि आढळत, तेथे एखादे मोठे सरोवर दिसे वा जवळजवळ आटलेले छोटेसे तळे ! आनंदने सर्वच दिशांना आपली माणसे पाठविली आणि त्याना कोठेहि तळे वा झरा आढळतो कां ते पाहाण्यास सांगितले. त्यावेळी सकाळचे पांच वाजले होते नि सूर्य खूपच प्रखर होऊन प्रवास अशक्य झाल्याने थांबण्यास फक्त चारच तास उरले होते. स्वत: आनंदनेहि, तो जात असलेल्या दिशेनेच पण सखल भागांत नि खडकाळ प्रदेश या दरम्यान पाण्याचा शोध घेण्याचा यत्न केला.

सुरवातीस त्याचे नशीब चांगले नव्हते. पण त्यानंतर त्याला दाट वाढलेल्या गवताचा एक छोटासा जमिनीचा तुकडा आढळला. तो भूभाग इतका लहान होता, की आनंदने जर जमिनीचा अभ्यास काळजीपूर्वक केला नसता तर तो नक्कीच त्याच्या नजरेतून सुटला असता. पण तो तुकडा दृष्टीस पडतांच त्यांच्या मनांत आशा निर्माण झाली. कारण त्या भागांत जमिनीखाली पाण्याचा साठा असल्याखेरीज त्या वालुकामय प्रदेशांत गवत उगवणे शक्यच नाहीं अशी





त्याला खात्री वाटत होती. त्यानें आपल्या लोकांना तेथे खणायला सांगितले. बरेच खोल खोदल्यावर त्यांची पहार एका खडकावर आदळली व सारेच निराश झाले. तथापि आनंदने स्वत: खडकाच्या भोवताली खोदकाम केले नि त्याला तेथील वाळू ओलसर असल्याचे आढळून आले. तिथली जागा थोडीशी साफ केल्यानंतर त्याने जमिनीस कान लावला व त्याला पाण्याचा खळखळाट ऐकू आला. त्याने आपल्या लोकांना सांगितले, की, धीर सोडू नका. त्या सर्वांनीच खडकाभोवती कुदळी मारण्यास सुरवात केली. त्यांना जरी तो खडक उचलता आला नाहीं, तरी तो सरकवून बाजूला ढकलणे मात्र त्यांना शक्य झाले. त्याखाली छोटासा भूमिगत झरा

वाहत होता. सुरवातीस त्या झऱ्याचे गढूळ पाणी आजूबाजूची माती वाहून नेईपर्यंत त्यांनी दम धरला. थोडा वेळ पाण्याचा चिखल वाहून गेल्यावर त्याचा गढूळपणाहि कमी झाला. त्यांनी आपल्या जवळची सारी गाडगीमडकी पाण्याने भरली. तो ओढा कमालीचा छोटा असल्याने त्यांना पाणी भरण्यास कांहीसा वेळ लागला. तथापि सूर्याची उष्णता असह्य होईपर्यंत दोन तीन दिवस पुरेल इतके पाणी भरणे त्यांना शक्य झाले.

त्यांनी तांतडीने गाड्यांची योजना वर्तुळाकार केली नि त्यांची सावली निर्माण केली. नंतर सारी मंडळी तेथे विसावा घेण्यासाठी सावलीत बसली असता आनंद म्हणाला, "आतां आपण संकटातून बाहेर पडलो आहोंत. पण भावी काळाकरीता आपल्याला काही धडे गिरवावे लागतील. दूरवरच्या देशांना जायचे, तिथल्या लोकांना भेटायचं. त्यांच्याशी व्यापार करायचा, या साऱ्या बाबी आनंदाच्या तर खऱ्याच, पण प्रवास मात्र बऱ्याचदा अडचणींचा आणि दमबि-णारा असतो. लोक थकणार, त्यांना झोप येणार. त्याबद्दल त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. पण एक गोष्ट मात्र लक्ष्यांत ठेवा. या वाळवंटात प्रवास करतांना जो अग्रेसर म्हणजे पुढे असलेला असेल त्याच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तो जर पुरेसा जागरूक नसेल, तर संपूर्ण काफिल्यालाच बिकट अडचणींना तोंड द्यावे लागेल. तेव्हां तुमच्यांत जो कोणी अग्रेसर बनविला असेल, त्याला जर थकवा आला असेल, झोप अनावर होत असेल तर त्यानं मला लगेच तसं सांगावं. मी त्याला विश्रांति घेण्यास संमति देईन नि त्याच्याबरोबर जो दुसरा कोणी असेल त्याला पहिल्याच्या जागी नियुक्त करीन; आणखी एक सांगायची गोष्ट म्हणजे वाळवंट ओलांडत असतांना, कोणीहि कोणत्याहि कारणास्तव, आपल्याजवळचं पाणी फेकून देऊं नये. आपण आणखी कशाचाही त्याग करू शकतो; पाण्याचा नाहीं! पाणी जरी थोडंसं खराब झालंसं वाटत असेल, तरीहि जेव्हां आपण एखाद्या ओढ्याजवळ किंवा तलावापाशी पोहोचू नि आपल्याला ताजं पाणी आपल्या भांड्यांत भरून घेणं शक्य असेल, तरच हे पहिले बाशेळं पाणी फेकून देता येईल."

आनंदनं सांगितलेला हा सूज्ञ उपदेश सर्वांना जरी त्यावेळी पटला तरी त्यांच्या लक्ष्यांत मात्र राहिला नाहीं नि त्यांच्यावर फिरून एक आपत्ति आली, परिणामी काही आठवड्यांनी त्यांना पुन: एका महान्-संकटाला तोंड द्यावे लागले. नेमक्या याच जागी लुटारूंनी जीवकाची नि त्याच्या तांड्याची फसवणूक, तशीच, लुबाडणूक केलेली होती. नेहमीप्रमाणेच तो लुटारूंचा म्होरक्या आणि त्याचे दहा साथी अशी त्या अकरा जणांची टोळी तेथे आ ी नि तिने त्या काफल्याला गांठून मैत्रीचा मोठा देखावा करीत अभिवादन केले. पण काय कारण असेल ते असो, अगदी सुरवातीपासून आनंद त्यांच्याबद्दल साशंक होता. त्यातूनहि जेव्हा त्या म्होरक्याने ते सारे राजदूत असून खास कामगिरीवर निघाले असल्याचे सांगितले, तेव्हा तर त्याचा संशय जास्तच दुणावला. कारण त्या अगोदर ज्या ज्या प्रदेशांतून त्यांचा काफिला गेलेला होता, त्या त्या ठिकाणी त्याला तेथील सैनिक रक्षक आरक्षी (पोलीस) वेगळ्या वेषांत—खास कपड्यांत—आढळले होते. त्यांची शिरस्त्राणेहि निराळी असत. आणि इथे पहावे तर प्रत्येक राजदूताचा वेष निराळा! पुन: राजाचे दूत असे स्वत:ला शाळकरी, मुलांप्रमाणे फुलांनी सजवीत नसतात.





मग त्यांना जंगलातून जावयाचे असो, की, वाळवंट तुडवायचे असो अगदी एखादी हरितभूमि (ओॲसिस) जवळ असली नि तिकडे जावयाचे असेल, तरीहि ! राजाचे अधिकारी जे बोलत तेहि खास भाषेत; अधिकारवाणीने, पण सौजन्याने ! त्यांची भाषा असे ती विशेष नागर सुसंस्कृत स्वरूपाची. येथे ते 'राजदूत' एकदम एकाच वेळेस बोलत होते, त्यांची बोलण्या-चालण्याची पद्धत असंस्कृत, कांहीशी रानटीच, भासत होती. कधीहि पाठशाळेचे तोंड न पाहिलेल्या लोकांनी बोलावे तोच ते बोलत होते.

आतापर्यंत आनंद त्यांच्याबद्दल चांगलाच साशंक झालेला होता. मग त्यांच्या घोड्यांवर चिखल कसा नि कोठून उडाला आणि त्यांनी आपल्या केसांत कमळे कशासाठी घातली होती, असे क्षुल्लक प्रश्न विचारण्याची त्याला गरजच भासली नाही. जेव्हां त्या टोळीच्या म्होरक्याने आपणहूनच आनंदला सांगितले की, नुकताच पाऊस झालेला असल्याने जवळपास बरेच पाणी आहे, तेव्हा त्यांनी आपल्याजवळची पाण्याची सारी भांडी ओतून त्यांत ते नवे पाणी भरण्यास हरकत नाही. अशाप्रकारे जवळचे ओझे कमी झाल्यामुळे तुम्हाला लवकर त्या जागी पोहोचता येईल. आनंदने त्यांना नम्रपणेच सांगितले, "आपल्या या सुचनेबद्दल आभारी आहोत. सभ्य गृहस्थ हो ! तुम्ही दाखविलेल्या दिशेनेच आम्ही कूच करू. आता आम्ही तुमचा फार वेळ घेत नाही. तुम्ही महाराजांच्या महत्त्वाच्या कामगिरीवर निघाला आहांत, तेव्हा, तुम्ही वेळ न दवडता तिकडे जावं, हे उत्तम !" आतां त्या लुटारूंना तेथे रेंगाळण्यास निमित्तच उरले नव्हते. तेव्हां ते आपल्या अश्वांवर आरुढ होऊन प्रस्थाण करते झाले. तथापि कांहीं अंतर गेल्यावर ते तेथील खडकाळ भागांत लपून बसले व तो काफिला पुढे काय करतो ते न्याहाळत राहिले.

ते लुटारू दृष्टीआड गेल्यानंतर तेथे म्हणजे आनंदच्या काफिल्यांत एकच जल्लोष झाला. आपल्याजवळचे जुने शिळे पाणी फेकून वजन कमी करायला आणि त्या लुटारूंनी दाखविलेल्या दिशेने प्रयाण करण्यास प्रत्येकजण उत्सुक झाला होता.

पण आनंदने त्यांना थांबविले, तो म्हणाला, "आपण प्रत्यक्ष त्या तलावाजवळ किंवा ओढ्यापाशी पोहोचेपर्यंत जवळचे पाणी फेकून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाहीं. गेल्या वेळी आपण पाणी फेकून देण्याची चूक केल्यामुळे आपल्याला किती भीषण संकटाला तोंड द्यावे लागले होते हे तुम्ही सारे विसरलेले दिसतां ! त्या अपरिचित आणि अनाहूत लोकांनी दाखविलेल्या दिशेने जावयाचे म्हणत असाल, तर तसं करायला मी सुतराम् तयार नाहीं, कारण ते लोक सैनिक, आरक्षी (शिपाई), रक्षक वा राजदूत यांच्या पैकी कोणीच वाटत नव्हते."

पण यावर जमावाची प्रतिक्रिया मात्र चांगलीच वाईट झाली ! सगळेजण रागारागाने बोलू लागले. "कां, नाहीं जायचे तिथे ? या भिकार वाळवंटांत आम्ही पाणी पाणी करून तडफडत मरावं, असं तुम्हाला वाटतं काय ? काय वेडबिड लागलं आहे की काय तुम्हांला?"

"क्षणभर माझं बोलणं तर ऐकून घ्या." आनंद म्हणाला, कारण त्याला ती आरडा ओरड थांबल्याशिवाय बोलणेच अशक्य झाले होते. हाताने त्यांना थांबण्याचा इशारा करीत-तो म्हणाला "ती माणसे सांगत होती की येथून थोड्याच अंतरावर थोड्या वेळेपर्यंत पाऊस



पडत होतां  इथला भाग खडकाळ असल्यामुळे थोडासा उंच नि सपाटच आहे. गेले कित्येक दिवस आपण या सखल वाळंवंटातून प्रवास करीत आहोत. हे वाळवंट सपाट असल्याने आपल्याला कित्येक कोस दूरवरच दिसू शकतं. आता मला हे सांगा, तुम्हाला पावसाचे ढग किती दूर वर दिसू शकतील ?"



"या वाळवंटांत कित्येक कोसांपर्यंत--"

"आणि तुमच्यापैकी कोणाला ढगाचा एखादा सुळका तरी दिसला आहे का ?"

तेथे थोडा वेळ शांतता पसरली. मग एकजण हळूच म्हणाला, "नाही !"

"आणि तुम्हाला वीज चमकलेली किती दुरून दिसते ?"

"कित्येक कोसांवरून !"

"मग तुमच्यापैकी कोणाला तरी वीज दिसली का ?"

"नाही !"

"आणखी एक प्रश्न ! ढगांचा गडगडाट तुम्हांला किती अंतरावरुन ऐकू येतो ?"

आता बऱ्याच जणांनी उत्तर दिले--"खूपच लांबून !"


"मग तुमच्यापैकी कोणी तो ऐकला का ?

आता मात्र सगळेजण एकदम ओरडले--"नाही!"

हा जल्लोष थांबल्यानंतर थोड्या वेळाने कांहीशा साहसानेच एकाने प्रश्न विचारला, "मग आतां काय करायचं ? त्या लोकांवर आता माझाही विश्वास उरलेला नाहीं. तेव्हां त्यांनीं दाखविलेल्या दिशेने आपण जाऊ नये हेच बरोबर! पण मग जायचं तरी कुठे ?"

आनंद म्हणाला--"मीहि त्याचाच विचार करतो आहे. असं पाहा ! त्या माणसांना मी लांबूनच नीट पाहिलं होतं तुमच्याहि कितीतरी अगोदर ! ते पहिल्यांदा आले डावीकडनं, आपल्या समोरनं मार्ग ओलांडून गेले, नंतर मागे वळले आणि परत फिरून आपल्या उजवीकडे त्यांनी बोट दाखविलं नि सांगायला लागले की, तिकडे पाऊस पडतो आहे, म्हणून ! त्यांच्या घोड्यांच्या अंगाला ओला चिखल लागलेला होता नि त्यांच्या केसांतही कमलपुष्पंहि ताजीच दिसत होती, त्याचाच अर्थ जवळपास नक्कीच कोठेतरी पाणी असलं पाहिजे. पण ते असणार डावीकडे, ते सुरवातीला जिकडून आले, तिकडे ! तेव्हां आपण डाव्या दिशेने जाऊ या."

अनेकांना त्यांचे म्हणणें बरोबर वाटले नि ज्यांना ते पटले नाहीं त्यांनाहि सांगायला पर्याय असा नव्हता. मग ते तरी विरुद्ध सूचना काय करणार ? मग तो संपूर्ण काफिला डावीकडे वळला नि थोडीशी वाटचाल केल्यावर खरोखरीच एका तळ्यापाशी येऊन पोहोंचला. ते तळे फारसे मोठे नव्हते, पण त्यांच्या घागरी आणि मडकी भरून घेण्याइतके पुरेसे पाणी त्यांत होतेच ! तिथे थोडावेळ विश्राम केल्यानंतर, आनंदचे सहजच काही अंतरावरील प्रचंड खडकांच्या समूहाकडे लक्ष गेले. दुरून मात्र ते फार उंचवट्यासारखेच भासत होते. पण त्यानें त्यांचे थोडेसे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर कित्येक गोष्टी त्याला आपोआपच समजून आल्या. त्या खडकांच्या रचनेत काहीसे फेरफार केलेले दिसत होते. बहुधा निवारा म्हणून, बंदिस्त छावणी म्हणून, किंवा, गोदाम म्हणून ! तेव्हा त्याने आपल्या लोकांना तेथे चलून जवळचे निरीक्षण करण्यास सांगितले. प्रत्यक्षांत ती जागा म्हणजे मोठमोठ्या खडकांनी बंदिस्त केलेली व त्यावर एखाद्या छपराप्रमाणे पूर्णपणे ओणावलेल्या तटबंदीसारखी किंबहुना तटबंदीच होती. ते सारे खडक तेथे वर्तुळाकार पसरलेले होते. सुरवातीलाच तर त्यांत शिरण्याचा मार्गच सापडला



नाही. पण आनंदने त्या जागेभोवती बऱ्याच फेऱ्या मारल्यानंतर त्याच्या लक्ष्यांत आले की, एका ठिकाणी पाटीसारखी दिसणारी शिला खडकांत खोदलेली आहे. जर चार पांच लोकांनी शक्ति एकवटून ती शिला हलविण्याचा प्रयत्न केला तर ती महाद्वारासारखी उघडू शकेल !

अखेर त्यांनी त्या बंदिस्त जागेत प्रवेश केला तेव्हा ते चांगलेच चकित झाले. चांदी सोन्याची नाणी भरलेली कित्येक पात्रें तेथे होती, शिवाय व्यापारी मालहि बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होता. त्यांतला काही माल आणि ते माल भरलेल्या पेटया कित्येक जणांनी जीवकाच्या तांड्यातील मालाच्या पेट्या म्हणून बरोबर ओळखल्या. आता सर्व चित्र स्पष्ट झाले होते. त्यांना ज्या लोकांनी अभिवादन केले होते ते सारे लुटारू होते. त्यांनीच जीवकाच्या तांड्याची लूट केली होती व बहुतेक सारा माल विकून टाकला होता. आनंदने तो सारा पैसा व तेथे शिल्लक असलेला सर्व माल आपल्या काफिल्यांतील बैलगाड्यांतून भरला. आपण लुटलेली सारी संपत्ति गमावली



कारण ती या व्यापाऱ्यांनी नेली असल्याचे त्या लुटारूंना समजून चुकले, कारण बऱ्याच अंतरावरून त्यांना ते सारे स्पष्टच दिसत होते. त्या काफिल्यांतील सारे लोक त्या ठिकाणच्या मालाच्या पेट्या बाहेर आणून आपल्या गाड्यांत भरत असल्याचे त्यांनी आपल्या डोळ्यांनीच पाहिले होते. पण त्यांची त्या व्यापारी तांड्यावर हल्ला करण्याची हिंम्मत मात्र झाली नाही; कारण, ते व्यापारी त्या तळ्यावर पाणी पिऊन आणि विश्रांति घेऊन ताजेतवाने झाले होते. आणि हल्ल्याचा प्रतिकार करण्याची ताकद त्यांच्यात असणार हे त्यांना चांगले माहित होते.

आणि अशा प्रकारे त्या काफिल्याने बऱ्याच देशातून प्रवास केला, अनेक प्रकारच्या लोकांशी व्यापार-व्यवहार केला आणि कित्येक रोमांचकारी क्षणहि अनुभविले. आनंदने मथूरेहून हस्तिदंताची कोरीव कामे केलेल्या कैक वस्तु बरोबर नेल्या होत्या, हे तुमच्या लक्षांत असेलच! त्यावेळच्या गांधार देशाच्या म्हणजे सध्याच्या अफगाणिस्तानच्या लोकांना तर त्या फारच आवडल्या आणि त्यांनी त्या साऱ्या खरेदीहि करून टाकल्या. जेव्हां बा ीच्या व्यापाऱ्यांनाहि आनंदच्या या वस्तु गांधार देशाच्या लोकांना किती आवडल्या हे समजलं, तेव्हां त्यांनीहि त्यांचा नियमित व्यापारच करायला सुरुवात केली.

आतां तुम्हाला एक आश्चर्याचा धक्का देतो. मथुरेच्या त्या कोरीव कामे केलेल्या प्राचीन हस्तिदंती वस्तूंचा आतापर्यंत सांपडलेला संग्रह अगदी आपल्या या काळांतहि, भारतांत नव्हे तर, 'बेग्राम' या ठिकाणी सापडला आहे. ही जागा अफगाणिस्तानांत काबुलच्या उत्तरेस ८० किलोमीटर अंतरावर आहे. काबुल ही अफगाणिस्तानची राजधानी आहे. हे तुम्हाला माहीत आहेच. सध्या या कोरीव कामाच्या वस्तु काबुलच्या संग्रहालयांत तसेच पॅरिसमधील गिमेत (GUIMET) संग्रहालयांत आढळून येतात.





आनंदचा काफिला जेव्हा अनेक महिन्यांच्या प्रवासानंतर भरपूर नफा कमवून परतला तेव्हा पाटलिपुत्राच्या लोकांनी त्यांचे प्रचंड स्वागत केले. आनंद हा एक अत्यंत कार्यक्षम युवक असल्याचे नंदालाहि कळून चुकले होते. नंदाची कन्या सुनंदा व आनंद यांचा विवाह मोठ्या थाटामाटाने झाला व अख्या नगराने ते आपले घरचेच कार्य समजून उत्साहाने भाग घेतला. याचे कारण, आनंदने एक फार चांगली गोष्ट केली होती. तुम्हाला आठवतंय, की, त्या चोरांनी व्यापाऱ्यांना लुबाडून त्यांचे धन त्या खडकाळ प्रदेशांत लपवून ठेवले होते नि तेच धन आनंदने सुखरूप परत आणले होते. जे लोक जीवकासमवेत त्या तांड्यांत प्रवासास म्हणून गेले होते नि कधीच परत आले नव्हते, त्या साऱ्यांच्या कुटुंबीयांना त्याने हे धन वाटून टाकले होते.

आणि हो ! आपल्या आनंदच्या काफिल्यांत एक बुद्धदास नावाचा बौद्ध भिक्षु सामील झाला होता. हे तुम्हांला सांगितले होते, नाही का ? पण तो त्या काफिल्यासह परत मात्र आला नाही. बल्खला जातांना आनंदच्या काफिल्याने हिंदुकुश पर्वत ओलांडला होता नि परततांनाही त्याला तसेच करावे लागले होते. त्यावेळी बुद्धदासास वाटले की पर्वत चढल्यानंतर प्रवासी थकून जातील. तेव्हा त्या व्यापाऱ्यांच्या विश्रांतीसाठी आपण एखादे विश्रामधाम (विहार) बांधावें, आणि त्याच पर्वताच्या पायथ्याशी दुसऱ्या बाजूस त्याला तशी जागा आढळलीहि ! ती त्यास त्याच्या कार्याच्या दृष्टीने योग्य वाटली. बुद्धदासाने तीर्थयात्रा करताना अजिंठ्यास नि या स्थळासहि भेट दिली होती. आज त्या स्थळाचे नांव आहे बामियन आणि त्यांचे अजिंठ्याशी बरेच साम्यहि होते. तेथे चंद्रकोरीसारखी पहाडी जागा होती आणि तिच्या पायथ्याशी झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याने आणि थोडचाफार वनश्रीने नटलेली आल्हाददायक जागाहि होती. दरीमध्ये तेथेच वास्तव्य करून त्याने लोकांना भगवान् बुद्धाची शिकवण, उपदेश स्वरूपांत सांगावयास आरंभ केला. तेथेच त्याने आपल्या शिष्यांच्या मदतीने गुहाहि खोदायला सुरवात केली. खरे म्हणजे, त्या गुंफा या मोठमोठ्या 'शाला (हॉल)' होत्या. कित्येक लोक सहज एकत्र राहू शकतील इतक्या त्या मोठ्या होत्या. वर्षानुवर्ष वेगवेगळ्या काफिल्यांतून प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्या स्थलीं राहून विश्रांति घेतली व कृतज्ञता म्हणुन देणग्याही दिल्या. त्यामुळे अधिकाधिक नि चांगल्या गुंफा तयार करणे बुद्धदासास शक्य झाले.

आणि हे काम कित्येक शतके त्याच्या मृत्यूनंतरहि चालले होते. महान् चीनी यात्रेकरू ह्युएन्त्संग याने अनेक संकटांना तोंड देऊन भारतास गौतम बुद्धांची कर्मभूमि या नात्याने भेट दिली. ही घटना घडली सातव्या शतकांत ! म्हणजे तेराशें वर्षांपूर्वी. ज्यावेळी तो या भागांत आला होता त्यावेळी त्यास येथे कित्येक मठ व हजारों बौद्ध भिक्षु आढळून आले. त्या गुंफांतील सर्व भिंतींवर भगवान् बुद्धांच्या जीवनांतील प्रसंग, रंगीत चित्रांच्या स्वरूपांत रंगविले होते. त्याचप्रमाणे तिथे गौतम बुद्धांचे दोन भले मोठे पुतळेहि होते. त्यापैकी एक ३४ मीटर उंचीचा तर दुसरा सुमारे ४९ मीटर उंचीचा होता. हे दोन्हीं पुतळे पहाडातून, कातळातूनच खोदलेले होते.

ते भव्य पुतळे, त्या रम्य गुंफा, चित्ताकर्षक रंगचित्रे, या साऱ्या गोष्टी आजहि पाहायला मिळतात. तथापि त्या साऱ्या बाबींस खूपच काळ लोटलेला असल्याने सारे काही उद्ध्वस्त अवस्थेत होते व त्यांच्या पुनरुज्जीवनाचे कार्य लवकरच हाती घेणे आवश्यक ठरते. अफगाणिस्तान व भारत हे दोघेही मित्र आहेत. आपल्या देशाने त्या बामियन या ठिकाणी पुराण-वास्तुशास्त्रज्ञांची एक तुकडी पाठविली होती. तिने तिथे बरेच वर्षे काम केले व त्या सर्व

उद्ध्वस्त वस्तु आणि वास्तु व्यवस्थित सांधल्या, म्हणजेच, व्यापाऱ्यांनी आणि भिक्षूंनीं फार फार वर्षांपूर्वी या स्थळाची जी उभारणी केली होती. ती काळाने उद्ध्वस्त केलेली असतानांही या लोकांनी फिरून पूर्ववत् जुळवून दाखविली व दोन्ही देशांसाठी एक महान् कार्य पार पाडले !





# हत्तीं अणि भट्टतितर

तुम्ही इतिहासाच्या पुस्तकांत अनेक युद्धांविषयी वाचले असेल. आपल्या मातृभूमीवर हल्ला करणाऱ्या आक्रमकांचा प्रतिकार करतांना शौर्य व धैर्याने लढतांना हसत हसत प्राणांची आहूति देणाऱ्या लोकांच्या कहाण्या व गाणी तुमच्या ऐकण्या-वाचण्यांत आली असतील. पण एक क्षणभरच विचार करा. मनुष्य जर भांडकुदळ नसता, तर, हे सारे इतिहासांतील नायक दीर्घकाळ जगले असते नि आपल्या मायदेशाची त्यांनी अनेक शांततापूर्ण म्हणजे युद्धेतर प्रगतिशील मार्गांनीं सेवा केली असती. हे विश्व प्रत्येक जणास राहण्यासाठी अधिक रम्य ठिकाण बनले असते.

पण अखेरीस लोक युद्धे तरी कशासाठी करतात ? कारण प्रत्येक राष्ट्रास असेच वाटते, की, देवाने हे जे सुंदर जग निर्माण केले आहे, ते केवळ आपल्यासाठीच आहे. खरे म्हणजे ईश्वराने निर्माण केलेली ही सृष्टि सर्वांकरीताच आहे म्हणूनच, प्रत्येक राष्ट्र, दुसऱ्या सर्व राष्ट्रांची संपत्ति हस्तगत करण्याच्या यत्नांत असते.

आजवर या शतकांत जगाने दोन भीषण जागतिक महायुद्धे पाहिली, अनुभविली. त्यातून अखेरीस काय निष्पन्न झाले ? लक्षावधि लोकांना हालअपेष्टांत लोटले. खरे म्हणजे संपूर्ण मानवजात इथून तिथून एकच आहे, पण स्वार्थी मनोवृत्ति आणि हिंसाचार यांचा जर

त्याग केला नाही, तर मानवजातच या भूतलावरून नष्ट होण्याचा धोका आहे. कारण आपण सारे मानव असलो तरी या मानवानेच आजवर इतकी प्राणघातक शस्त्रास्त्रे शोधून काढली आहेत, की आणखी एखादे भयानक महायुद्ध भडकले तर त्या वणव्यांत समस्त मानव-जातही—अखिल पृथ्वीच—कायमची नष्ट होण्याची दाट शक्यता दिसते.

पण या जगतांत सर्वत्र पसरलेली सारी माणसे एका विशाल विश्वकुटुंबाची घटक आहेत, असे जर मानले तर, ही संपूर्ण मानवजात किंबहुना मानवीकुटुंब हेहि जगांतल्या इतर जीवंत प्राणिसृष्टीचेच घटक ठरत नाही काय ? सुंदर प्राणी, आकर्षक पक्षी, मनोवेधक वनस्पति या सर्वांची निर्मिति देखील परमेश्वरानेच केलेली आहे. म्हणजेच, ही सारी सृष्टि आणि मानवजात हे सारे परस्परांचे नातलगच ठरतात.

तथापि मानवजातीतील बऱ्याच जणांना या बंधुभावनेची जाणीव-पुसटशीहि कल्पना-नसते. आजवर माणूस या साऱ्याच इतर प्राण्यांशी वा वनस्पति सृष्टीशी फार क्रूरपणे वागत आला आहे. आता प्राणीहि एकमेकांना खातात हे खरे आहे, पण तेहि जर भूक लागली असेल तरच; उगीचच हौस-मौज म्हणून नव्हे. उलट मनुष्य मात्र करमणुकीचे एक साधन म्हणून त्यांची शिकार करतो, मग खरोखरीच त्या मुक्या प्राण्यांना मारण्याची गरज असो नसो. या मानवी निर्दयपणापायी जगांतील कित्येक सुंदर व मनोवेधक पशु पक्षी जवळजवळ कायमचे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

पण अलीकडे मात्र मानवाचे कांहीसे हृदयपरिवर्तन झालेले दिसते. पूर्वी लोक आपल्या सभोवतालच्या प्राणिजगताची फारशी दखल घेत नसत. आज मात्र त्यांच्याबद्दल बरेच कुतुहल निर्माण झालेले दिसते. हे पशु, पक्षी किती सुंदर, किती देखणे आहेत, याची जाणीव सर्वांना झालेली दिसते. या पशुपक्ष्यांच्या राहणीतहि किती वैचित्र्य आहे, हेहि आजचा माणुस उत्सुकतेने पाहत असतो. लोकांनी जंगलांत संशोधन केले आहे., पर्वत धुंडाळले आहेत, खेरीज त्यांनी आजवर अज्ञात असलेल्या विचित्र प्राण्यांचाहि शोध लावला आहे. परमेश्वराची ही सृष्टि, आपल्या कल्पनेपेक्षाहि जास्त संपन्न व आश्चर्यकारक आहे.

तर ही कथा आहे एका भट्टतितराची. ती 'फिजंट' पक्षी कुलांतील आहे. या पक्ष्यांबद्दल तुम्हाला काय माहिती आहे ? तेव्हा भट्टतितरची कहाणी सांगायला सुरवात करण्यापूर्वी एक सत्यकथाहि ऐकवतो !

सन १९१३ मधली ही गोष्ट. एक पक्षिप्रेमी आणि प्रवासाचा महाशौकीन चॅपीन नांवाचा संशोधक असाच हिंडत होता. आफ्रिकेतल्या कांगोनदीच्या खोऱ्यांत इडरीनामक एक घनदाट जंगल आहे. तिथे या प्रवाश्याला, तेथील एका वन्यजमातीतील एका आदिवासी माणसाच्या हॅटमध्ये एक निराळ्याच तऱ्हेचे पीस आढळून आले. त्याने त्या आदिवासीला ते पीस देण्याची विनंती केली. युरोपला परतल्यानंतर त्याने ते पीस अनेक लोकांना दाखविले त्या विशेषज्ञांनी जीवनभर संपूर्ण जगांतील पक्ष्यांचा अभ्यास केलेला होता. पण हे कोणत्या पक्ष्याचे पीस आहे ते मात्र त्यापैकीं कोणासच सांगता आले नाही.



तथापि त्या नंतरच्या वर्षी मात्र, बेल्जियम कॉंगो येथील संग्रहालयास आणखी एका बेल्जियम संग्रहालयाकडून कांही भरघोस पिसारे असलेले पक्षी मिळाले. ते १९०० सालापासून त्या संग्रहालयापाशी होते,. या पैकी दोन पक्ष्यांचे, मोराशी काहीसे साम्य होते. परंतु त्या संग्रहालयापाशी मयूर व तद्‌वर्गातले पक्षी अगोदरपासूनच होते. म्हणून हे पक्षी सर्वांच्या पाहण्यासाठी न ठेवता वेगळया स्टोअररुममध्ये म्हणजे कोठीत ठेवलेले होते. हे सारे पक्षी जीवंत नव्हते, तर त्यांचा मृत शरीरांत पेंढा भरुन ते जपून ठेवलेले होते, हे लक्ष्यांत ठेवले पाहिजे.

१९३६ साल उजाडले, योगायोगाने चॅपीनने याच संग्रहालयास भेट दिली. हे पक्षी नजरेस पडतांच तो आश्चर्याने जागच्याजागी खिळूनच उभा राहिला. कारण त्याच्यापाशी जे पीस होत ते याच पक्ष्याच असणार याबद्दल त्याला कोणतीच शंका नव्हती. एका बेल्जियन



मित्राने चॅपीनला असे सांगितले होते, की आपण १९३० मध्ये काँगोच्या जंगलांत असतांना एक विचित्र पक्षी बंदुकीच्या गोळीने टिपला होता व भाजून खाल्ला होता. त्या मारलेल्या पक्ष्याच्या डोक्याचे चित्र त्याने स्मरणांतून काढले व त्यावरून ते याच पक्ष्याचे असावेसे दिसत होते. यावरून इतके स्पष्ट झाले, की काँगो खोऱ्यांतील जंगलांतून या मयूरसदृश्य पक्ष्याची पूर्वी फार मोठ्या प्रमाणांत वस्ती होती. यानंतर या पक्ष्यास शोधून काढण्याच्या कामास जोरदार सुरवात झाली, त्या अनुषंगाने अनेक पक्ष्यांचा शोध लागला नि आज आफ्रिके-बाहेरील कित्येक देशांतील मुलांना हा पक्षी तेथील संग्रहालयातून पहावयास मिळतो.

तथापि हा 'फीझंट' पक्षी मूळचा आफ्रिकेतला नाही. तो आहे आग्नेय आशियांतील ! त्या ठिकाणाबरोबरच सुमारे दीड कोटि वर्षांपूर्वी तो उत्तर आशिया, युरोप, आफ्रिका येथें आढळून येत असे. तथापि काळाच्या ओघांत, या पक्ष्याच्या संख्येबरोबरच जातिप्रकारहि वाढले, कारण आज या पक्ष्याच्या चाळीस विभिन्न जाति आढळून येतात. परसांतली कोंबडी आणि भट्टतित्तर हेहि याच पक्ष्याच्या जातिकुळातले वंशज.

फार फार वर्षांपूर्वी भट्टतित्तर पक्ष्याचे एक जोडपे हिमाचल प्रदेशांत वास्तव्य करीत होते. तेथे हिमालयाच्या पायथ्याशी दाट जंगले आहेत व काही अंतरापर्यंत ती पसरल्यानंतर पुढे झाडाझुडपांचा आणि दाट उंच वाढलेल्या गवताचा भाग सुरू होतो. नंतर येतात मैदाने व वाळवंटी ओसाड प्रदेश. कालांतराने त्या जोडप्यांतल्या मादीने तेथल्या जमिनीत अंडी घातली. काही दिवसांनी ती अंडी उबविली गेली आणि अंडयाची कवचे फोडून छोटी छोटी पिल्ले बाहेर आली. ती फारच गोंडस होती खरी, पण तितकीच त्यांच्या आईबाबांवर अवलंबूनहि ! कारण त्यांच्या पंखांत पुरेशी ताकद नव्हती. नंतर त्यांची पुरेशी वाढ झाली, अंगावर पिसे वाढली, पंखांतून शक्ति आली व त्यांना उडतांहि येऊ लागले. पण हे सारे नंतर ! सुर-वातीस यापैकीं काहीच शक्य नव्हते. मोठे पक्षी या पिल्लांना मारून खाण्यासाठी वरती आका-शांत नेहमीच घिरटया घालीत व या पिल्लांच्या आईबाबाना आपल्या बाळांचे सतत रक्षण करावे लागे.

ही जागा मैदानी असल्याने डोंगराळ भागांतील थंडी तेथे नव्हती. तथापि छायादार वृक्षही नसल्यामुळे सूर्याची प्रखर उष्णता थेट जमिनीस येऊन भिडत असे. त्यामुळे तो भाग सदैव तापलेलाच असे आणि तेथील प्राणी व पक्षी सतत तहानलेले असत. नाही म्हणावयास तेथे काहीशी शेवाळयुक्त, गवताळ, व दलदलीची जागा होती, पण तीहि बऱ्याच दूर अंतरावर म्हणजे पाण्यासाठी इतके लांब जावे लागत असूनहि त्या भट्टतित्तर पक्ष्यांनी आपले घरटे कधी त्या पाण्याच्या जागेजवळ बांधले नाही ! मग एखाद्या तळयाच्या, सरोवराच्या कांठी घरटे बांधण्याची तर गोष्टच सोडा. कारण त्या पाण्यांत काही पक्षी व प्राणी राहत होते, ते या जोडप्यापेक्षा नक्कीच सर्वबाबतीत मोठे होते. आणि त्यांनी त्यांचा केव्हांच चट्टा-मट्टा केला असता. त्यांची संख्या बरीच मोठी होती नि त्यांच्या पासून त्या लहानग्यांना विशेषच धोका होता. फार तर त्यांचे आईबाप उडून जाऊन स्वतःचे प्राण वाचवू शकले असते.

दिवसातनं दोनदा म्हणजे सकाळी व संध्याकाळी ती मादी आपल्या बाळांचे रक्षण करण्यासाठी घरट्यांत राहावयाची, नर मात्र त्या लांबच्या शेवाळी प्रदेशांत जावयाचा. तेथे पाणी पिऊन झाल्यानंतर तो आपले पंख पाण्यांत भिजवी म्हणजे त्याच्या पिसांना पाण्याचे थेंब, ओलावा, चिकटून राहत. नंतर शक्य तितक्या वेगाने ती पिसं लवकर वाळू नयेत म्हणून तो आपले घरटे गाठी. तेथे त्याची बाळे त्याला पाहिल्यावर त्याच्या जवळ येत व आपली इवलीशी डोकी त्याच्या ओल्या पिसांशी नेत नि त्यातनच गळणारे पाण्याचे थेंब ती आपल्या चिमुकल्या चोचींनी पीत असत. अगदी ती पिसे संपूर्ण कोरडी होईपर्यंत ! नंतर वडील मुलांजवळ असलेले पाहून त्या पिल्लांची आईहि तसेच करीत असे.

आपली बाळें लवकर मोठी व्हावीत व स्वत:ची काळजी घेण्यास समर्थ बनण्याएवढी स्वावलंबी बनावीत अशी प्रार्थना त्या पिल्लांचे आईवडील रोज देवास करीत असत. परंतु त्यांना कल्पनाहि नसेल इतक्या वेगाने एक संकट त्यांच्यावर कोसळू पाहत होते.

त्या पहाडाजवळच्या मैदानांत जी जंगले होती, तिथ हत्तींचा एक कळप स्वच्छंदपणे विहरत होता. तो मोठा असला तरी बेशिस्त मात्र नव्हता. त्याच्यांत इतकी शिस्त असण्याचे कारण म्हणजे त्यांचा उत्तम नेता ! खरे म्हणजे तो अगदी लहान पोरवयाचा असतांनाच त्याच्या आईबरोबर पकडला गेला होता. ज्या वनचर लोकांनी त्या दोघांना पकडले होते. ते सारे वाराणसीच्या (नंतरचे नाव बनारस) राजाचे सेवक होते. तिथेच त्याची नीट वाढ होऊन, तो आता भव्य हत्ती अगदी जणू काय गजराजच दिसू लागला होता. राजाच्या सर्व मिरवणूकींत तर त्याला अग्रमानच मिळे. देवराज इंद्राचा प्रसिद्ध गज ऐरावत यावरून त्यास हे नांव देण्यांत आले होते.

परंतु ज्या राजाच्या सेवेत तो होता तो मूर्ख व दुष्ट होता. एका सणाच्या दिवशी या ऐरावतावर बसून राजा जेव्हा नगरांत फिरत होता तेंव्हां त्यास असे दिसून आले की, आपणापेक्षा आपल्या वाहनाकडे व त्यावरील अंबारीकडे पाहूनच लोक अतिशय हर्षित झाले आहेत. त्या ऐरावताचा भव्य आकार, मोठ्या डौलाने डोके उचलून धरण्यांची त्याची ती ऐट, त्याची ही मंद मंद चाल, सारेच काही लोकांचे आकर्षण केंद्र बनले होते. त्या राजाने आपल्या शरीरावर उत्तमोत्तम अलंकार चढविलेले होते, तरी त्याच्यांबद्दल बोलण्यात कोणासच गम्य नव्हते. खरे म्हणजे अंगावरची ती भरजरी वस्त्रे व त्यावरील ते संपूर्ण दागिने यांचे त्यास ओझेच होत होते. त्यातून त्या दिवशी विलक्षण उकडतहि होते. त्याच्या गळयाभोवती तर इतके दागदागिने होते, की, कोणत्याही क्षणी आपला श्वास अडकून पडेल अशी भीति वाटत होती. तरीहि त्याने बळाबळानेच ते सारे अवजड जडजवाहिर आपल्या अंगाखांद्यावर चढविले होते, कारण तसा तो निर्बुद्धच होता आणि लोकांनी आपले कौतुक करावें म्हणून पोकळ डौल मिरवण्याची त्यास फार हौस होती. पण त्याचे दुर्दैव! संपूर्ण नगरीचे डोळे जणू फक्त त्या ऐरावतासच न्याहाळत होते. हजारों जिभांनी ती नगरी त्यांचेच कौतुक करीत होती. तो राजा तसा हलक्या मनोवृत्तीचाच होता. आपल्या त्या हत्तीचे कौतुक होत असलेले पाहून त्याने त्या हत्तीसच मारावयाचे ठरविले

त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्याने त्या ऐरावतास एका पर्वत शिखरावर घेऊन जाण्याचा आदेश दिला. नंतर राजेसाहेब व त्यांचे खुषमस्करेहि तेथे अवतीर्ण झाले.

"हा हत्ती चांगला शिकवून तयार केलेला आहे ना ?" राजाने माहुताला विचारले.


"हे काय विचारावं सरकार ? महाराजांच्या अख्या गजशाळांत आणि तबेल्यांत इतकं चांगलं शिकवलेलं जनावर मिळणार नाही."


"ठीक ! आता आपण त्याची खरीखुरी परीक्षा घेऊ या" तो दुष्ट राजा छद्मीपणाने हंसून म्हणाला.

त्याने माहुतास सांगितले, "या हत्तीला या पर्वताच्या अगदी पर्वताच्या सुळक्याशी जेथे कडा तुटतो तिथवर न्या".

राजाचे म्हणणे खरेच होते. त्या सुळक्याच्या टोकापासून इतका विचित्र उतार होता, की, तो कडा अगदीच तुटलेला नसला तरी त्याच्या टोकाशी गेल्यावर तो तुटल्यासारखाच दिसत असे. तेथून एकदम १०० फूट खाली जमीन होती व तेथेच ती घनदाट जंगलेहि होती.

नंतर त्या राजाने आज्ञा दिली, की, त्या हत्तीस त्या कड्याच्या टोकाशी तीन पायांवर उभे राहावयास लावावे. माहुताने तसा आदेश देतांच त्या मुक्या जनावराने तो निमूटपणे पाळला. तेवढ्याने त्या राजाचे समाधान झाले नाही. त्याने त्या हत्तीस मागच्या दोन पायांवर उभे करण्याचा आदेश दिला. त्यानंतर समोरच्या दोन पायांवर उभे राहण्याचा ! हत्ती झाला





तरी तो बुद्धिमान् होताच. समोरच्या दोन पायांवर उभे राहिल्यावर त्याला खालची ती खोलवरची मैदानी झाडींनी वेढलेली जागा दिसली. हा राजा आपली खरोखरीच परीक्षा घेत आहे, की आपल्याला मारण्याचा त्याचा विचार आहे, असेहि त्यास क्षणभर वाटून गेले. नंतरची राजाज्ञा कानावर पडतांच त्याचा सारा संशय नाहीसा झाला. विकट हास्य करुन राजा म्हणाला, "खरोखर हा इतका शिकून तयार झालेला दिसतो, की तो हवेतहि उभा राहू शकेल! त्याला कड्यावरुन हवेत उडी मारायला लावा."

तो माहुत इतका स्तंभित झाला होता, की, त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. पण मूर्ख राजाचा तोच आदेश ऐकण्यापूर्वीच ऐरावतानेहि पक्के ठरविले की जीवावर बेतले तरी बेहेत्तर, पण यापुढे या दुष्ट राजाकडे राहावयाचे नाही. अत्यंत जपून त्याने तो उतार उतरण्यास आरंभ केला. तो एकदम उतार होता खरा, पण ती घसरण खासच नव्हती. त्यामुळे निसरड्या जागेवरून कोसळून मरण्याचा धोका नव्हता. जमीन तशी खडकाळच होती. तेथे पाय रोवून उभे राहता येत होते. त्याने सोंडेने त्या खडकांची तपासणी केली आणि त्यापैकी एक पुरेसा टणक असल्याचे आढळल्यावर तेथे आपला पुढला उजवा पाय टेकला. नंतर दुसराहि टेकला व तोल साधला. नंतर त्याने डाव्या बाजूस आधाराची चाचपणी केली. त्यानंतर त्याने अत्यंत हळूहळू तो कडा उतरण्यास आरंभ केला. एकदम उतारावरुन खाली जाण्यापेक्षा असे करणे नक्कीच जास्ती सुरक्षिततेचे होते. कारण त्या अचानक उतारावर त्यास आपल्या अवाढव्य शरीराचा तोल सावरता आला नसता व तो खाली कोसळून निश्चितच प्राणांस मुकला असता.

अशा रीतीने त्या दुष्ट राजाचा वाईट हेतु तर विफल ठरला पण तेवढ्यावरच न थांबतां त्याने त्या माहुतांस व दरबारी लोकांना, त्या हत्तीला परत आणण्यास सांगितले. त्या हत्तीच्या मागे जायला लावण्याचा

हा हुकूम मूर्खपणाचाच होता. कारण त्या उंच कड्यावरून भयंकर उताराकडे पाहण्याची कोणाचीच हिंमत नव्हती. त्यामुळे तो राजा जागच्या जागीच जळफळत, पाय आपटीत, आरडाओरड करीत राहिलेला असतांनाच त्या ऐरावताने मात्र सावकाशपणे परंतु सुरक्षित रीतीने तो उतार उतरून पायथ्या जवळच्या निबिड अरण्यांत प्रवेश केला होता— आता तो दिसेनासाच झालेला होता.

त्या अरण्यांतच जरी ऐरावताचा जन्म झालेला असला तरी तो आपल्या आईबरोबर पकडला गेला त्यावेळी फारच लहान असल्यामुळे त्याला आपले बालपण किंबहुना शैशव अजिबातच आठवत नव्हते. तथापि आपल्याशी क्रूरपणे वागणाऱ्या माणसापासून दूर जावयास मिळाले याचाच त्याला अतोनात आनंद झालेला होता, परंतु त्या माहुताबद्दल मात्र त्याच्या मनांत प्रेमाचीच भावना होती. कारण त्याने त्याला स्वत:च्या मुलाइतकेच लाडाने वाढविले होते. नव्यानेच मिळालेल्या स्वातंत्र्याचाहि त्यास फार हर्ष झालेला होता. पण थोडेच दिवस ! नंतर मात्र त्यास अगदी एकटे भकास वाटू लागले. त्यातच त्याची आणखी एका हत्तींच्या कळपाशी गांठ पडली. त्याचे पुढारीपण एका म्हाताऱ्या मत्तदंतीकडे (हत्तीकडे) होते, त्या नायकास हा तरूण हत्ती फारच आवडला. तो त्यास नेहमी आपल्याबरोबर बाळगीत असे आणि अरण्यात कसे वागावे याची अनेक रहस्यहि त्यास शिकवीत असे.

हे हत्ती आफ्रिकी हत्तींइतके उंच अर्थातच नव्हते. ते कधीकधी साडेतीन मीटर उंचीचे असतात. त्यांचे कानहि चांगलेच मोठे असतात.



आफ्रिकी हत्तींची उंची १४ फुटांपर्यंत असते तर भारतीय वा श्रीलंकेतील हत्तींची उंची १० फूट असते. हे काळेकभिन्न तर नव्हतेच पण त्यांचे कानहि तितके मोठे नव्हते. त्यांच्या सोंडांना वळयाहि तितक्या (आफ्रिकी हत्तींइतक्या) नव्हत्या. तथापि ते दणकट व मजबूत होते. त्यांच्या नेत्याबरोबर सतत वावरतांना ऐरावतांस एक बाब पक्की समजून चूकली, ती म्हणजे अशा या कळपाचे नेतृत्व करणे रोमांचकारी पण तितकेच अवघड होते.

संपूर्ण कळप रात्री पाणी पीत असे व इकडेतिकडे मोकळेपणाने संचार करीत असे. येथेच त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत रोमहर्षक घटना घडली. रात्रीच्या वेळी वाघ, चित्ते यांसारखी हिंस्त्र श्वापदेहि त्या तळ्याच्या ऐवजी ओढे वा झरे देखील धुंडाळत असत. त्यामुळे पुरेशी काळजी घेतल्याशिवाय त्या जलाशयाच्या कांठीं जाणे त्या कळपाच्या दृष्टीने सुरक्षिततेचे नव्हते. त्यामुळे संपूर्ण कळप त्या तळ्यापासून सुरक्षित अंतरावर थांबत असे. अशी सुरक्षित जागा हेरण्यासाठी त्या कळपाचा नेता सर्वांच्या पुढे जात असे. अशा प्रसंगी तो अत्यंत संथपणे वाटचाल करीत असे. आता ते पांच सहा टन वजनाचे धूड त्या झाडीतून पालापाचोळयांत आवाज न करतां कसे चालत असेल हाहि प्रश्नच आहे. पण हत्तीचा पाय कसा असतो ? गादीसारखा किंवा उशीसारखा. त्या पायांच्या नसा व चरबी तळव्यांत दडलेल्या असतात; नि त्यामुळे हत्तीने पाय जमीनीवर टेकल्यावर आवाज होत नाही. मांजराच्या पायांचाहि चालतांना (किंबहुना त्याच्याहिपेक्षा मोठे उदाहरण म्हणजे वाघ सिंहाचे) आवाज होत नाही, हे तुम्हाला माहित आहेच ! अर्थात् ही तुलना एवढयापुरतीच, कारण एरवी मांजरासारख्या छोटया प्राण्याची हत्तीसारख्या भल्या मोठया प्राण्याशी तुलनाच होऊं शकत नाही !

तर, अशाप्रकारे त्या कळपाचा तो अग्रणी (नेता) ह्या जलाशयाशी पोहोचत असे, तेव्हा तो खंबीरपणे एकाच जागी स्तब्ध उभा राहत असे. पण सावधपणे व सर्वत्र लक्ष ठेवून ! फक्त सोंड इकडे तिकडे फिरवीत. याचे कारण हत्तीचे घ्राणेंद्रिय (वास घेण्याचे इंद्रिय) शिकारी कुत्र्याइतकेच तीक्ष्ण असते. त्या मानाने त्याची दृष्टि मंद असते, त्यामुळे त्याला गंधज्ञान (वास घेण्याची शक्ति) व शब्दज्ञान (ऐकण्याची शक्ति) यांवर विशेष अवलंबून राहावे लागते. तो आपली सोंड हवेत उगीचच चाळा म्हणून फिरवीत नाही. तसे केल्याने त्यास वाघ, चित्ते यांसारख्या वा इतर हिंस्त्र श्वापदाचा वास लागतो. आसमंतांत असा कोणतीहि धोका नसल्याची खात्री पटतांच तो अग्रणी छोटासा चित्कार करून आपल्या कळपास इषारा देत असे. त्या कळपास तो संकेत ऐकू येतांच तोहि त्यास तसाच प्रतिसाद देत असे. नंतर तो कळप हळूहळू आवाज न करता सावधपणे त्या तळयापाशी जाई. अशा सर्वच प्रसंगी तो नेता आपल्या ऐरावता-सहि बरोबर नेई आणि कळपाच्या नेत्यास ज्या ज्या गोष्टी माहिती असाव्या लागतात, त्या साऱ्या माहिती करून देई !

त्यामुळे जेव्हां त्या कळपाचा नेता मृत्यु पावला, तेव्हा त्या कळपाने ऐरावताचीच आपला नेता म्हणून निवड केली, यांत नवल नाही. त्याने संपूर्ण कळपाचे–विशेषत: तरुण हत्तिणींचे––

प्रेम मिळविले, याचे कारण तो कळपातल्या छोटया हत्तींवर फार माया करीत होता. उंच झाडांचे कोवळे अंकुर खुडण्याचा यत्न ती पिल्ले करीत, पण त्यांना ते जमले नाहीं, तर ऐरावत त्यांना ते खुडून देत असे! हत्तींचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांचे वजन कितीहि जास्त असले तरी ते उत्तम प्रकारे पोहू शकतात. उन्हाळयांत ज्याप्रमाणे तुम्ही मुले मोठया हौसेने नदीत, तलावांत किंवा विहिरीत पोहतां, उडया मारतां, शिवाशिवी खेळतां, त्याचप्रमाणे हत्तीदेखील पाण्यांत तसेच खेळ--जलक्रीडा खेळतात. पण तुम्हा मुलांप्रमाणेच ही हत्तींची छोटी पिल्ले देखील जेव्हां प्रथमच इतके अथांग पाणी पाहतात, तेव्हां तीहि घाबरतात. ऐरावत या छोटया पिल्लांना कांठावरून हळूच पाण्यांत ढकलत असे नि त्या छोटयांची भीति घालवायला, त्यांच्या जवळच पाण्यांत पोहत राहून त्यांना धीर देई. अशा प्रकारे तो त्या छोटयांची भीति घालवून पोहायला त्यांना शिकवत असे.

त्या कळपाचे एकूण जीवन, एक बाब वगळतां, तसे सुखाचे चालले होते. त्या कळपांत एक मत्त हत्तीहि होता. तो चिडखोर तर होताच, परंतु प्रत्यक्ष खाण्यासाठी लागणाऱ्या झाडांपेक्षा कितीतरी झाडे तो निष्कारण तोडून टाकीत असे. छोटया पिल्लांना तर तो जास्तच त्रास देई. नि तिरमिरीत येऊन मोठया हत्तींवर हल्ला करण्यासहि कमी करीत नसे. त्यासाठी कारण लागत नसल्याने हे सारे अनपेक्षितपणे घडून येई. ऐरावताने त्यास सुधारण्याचे बरेच यत्न केले पण त्याच्यावर कोणताच परिणाम न झाल्याने ते सारे वाया गेले. त्या लहरी, संतापी आणि अवखळ हत्तीवर साऱ्या कळपाने जणू बहिष्कारच टाकला आणि त्याला आपल्यापासून सतत दूरच ठेवले. तथापि त्या दांडग्या हत्तीने कळपाबरोबरचा संबंध मात्र तोडला नाही, की तो त्यांच्यापासून दूरहि गेला नाही. खरे म्हणजे, तो जर तसे करता तर ते फार चांगले झाले असते. तो त्या कळपासमवेत राही, त्याच्यामागून रेंगाळत राही, शिस्त पाळीत नसे व ऐरावतास सतत काळजीत ठेवी.

कोरडया ऋतूंत तो कळप साहजिकच घनदाट जंगलांत राहणे पसंत करी, पण पावसाळयांतच खरी पंचाईत होई, कारण पावसाळयाची सुरवात हा हत्तिणींचा विण्याचा (पिल्लें होण्याचा) काळ असतो. त्यावेळी त्या जंगले सोडून मोकळया जागी वा मैदानी गवताळ भागांत येतात. अशा प्रकारे एक दिवस ऐरावत त्या हत्तिणींसह त्या गवताळ भागांत आला. तेथेच ते भट्टितर जोडपे आपल्या पिल्लांसमवेत राहत होते.

ऐरावताच्या मते ही जागा हत्तिणींना विण्यासाठी योग्य अशीच होती. तिचे क्षेत्रफळ फारसे नसले तरी पुरेसे होते. त्या जागेच्या एका कडेस दाट गवत वाढले होते, थोडीशी झुडपेहि माजलेली होती. ऐरावताने त्या जागी जाऊन एखादे संकट येण्याचा धोका आहे काय, याची सूक्ष्म पाहणी केली. जेव्हा तो त्या घनदाट झाडांझुडपांतुन जाऊ लागला, तेव्हां त्याला आपल्या पुढील पायांदरम्यान काही तरी मऊ मऊ हालचाल जाणवली. तो जागच्या जागीच उभा राहिला, कारण ससा, साळू, खार वा एखादा तसलाच चिमुकला प्राणी तेथे असावा, असे त्याला

जाणवत होते. त्याने जरा जरी आपली पावले इकडे तिकड टाकली असती तरी तो चिमुकला जीव नक्कीच त्याच्या पायांखाली चिरडून मेला असता. हत्तीचा पाय किती मोठा असतो, तो एखाद्या प्रचंड खांबासारखा कसा भासतो हे तुम्हाला माहित आहेच. तो चिमुरडा जीव आपल्या भरदार पावलांखाली सापडून प्राणांस मुकू नये म्हणून ऐरावत्त हालचाल न करता तेथल्या तेथेच स्तब्ध उभा राहिला. त्या प्राण्याने पळ काढून तोवर आपला जीव वांचवावा, हीच त्याची इच्छा होती. नंतर ऐरावतास असे वाटू लागले की, तो जो कोणी छोटा प्राणी त्याच्या पुढल्या पायांपाशी लुडबुडत होता, तो अगदीच बिनडोक असावा. कारण बाजूच्या झुडपांत आसरा घेऊन आपला प्राण वांचविण्याऐवजी तो जीव तेथेच त्याच्या पायांपाशी घुटमळत होता. अत्यंत हळूवारपणे ऐरावताने आपले डोके खाली आणले व तो प्राणी आहे तरी कोणता तें पाहिले. त्याला सुरवातीला काहीच दिसले नाही, कारण तो ऐरावताच्या मागच्या पायांपाशी पोहोचला होता. कोणीच न दिसल्यामुळे ऐरावताने सोंडेच्या मदतीने त्याचा मागोवा घेण्याचा यत्न केला.

हत्तीची सोंड तशी मोठी व किचकट दिसते. पण तिला आपल्या बोटांसारखेच स्पर्श-ज्ञान असते. त्यामुळे त्याला जमिनीवर पडलेली एखादी छोटीसी वस्तूही आपल्या सोंडेत सहज उचलून धरतां येते. अगदी एखादे नाणे सुध्दा; तें जमिनीवर पडलेले असले, तरीहि ! जमिनीवरून सोंड फिरवीत असतानांच ऐरावताच्या सोंडेस कसल्या तरी हलक्या, चिमुकल्या व मऊशा वस्तूचा स्पर्श झाला. अत्यंत हळुवारपणे, विलक्षण काळजीपूर्वक त्याने ती वस्तु सोंडेत पकडली व ती निश्चित जाणून घेण्यासाठी सोंड वरती उचलली.



ती वस्तु म्हणजेच आपला भट्टतितर होता. त्याचे लहानगे पिल्लू! ऐरावताने आता काळजीपूर्वक त्या झुडपाकडे पाहिले व तेथे त्याला एक पक्ष्याचें घरटे आढळून आले. त्या घरटयांत आणखीहि एक छोटे बाळ होते. त्या भट्टतितरांचेच आणखी एक पिल्लू ! अत्यंत काळजीपूर्वक व विलक्षण हळूवारपणे ऐरावताने ते सोंडेत उचलले तें पिल्लू पुनः त्याच घरटयांत, जेथून उचलले होते तेथेच त्या दुसऱ्या पिल्लाच्या शेजारी ठेवले.

ऐरावताचे हे काम चालू असतानांच त्या पिल्लांची आई त्या घरटयापासून जवळच बोरे व बिया गोळा करीत होती. तिला ह्या सुगावा लागताच ती तांतडीने तेथे आली. तिने दुरुनच ऐरावतास पाहिले व हा आवाढव्य प्राणी आपले घरटे मोडणार व आपल्या बाळांना ठार मारणार या भीतीने कमालीची व्याकुळ झाली.

लहान मुले जशी प्रार्थनेसाठी आपले चिमुकले हात एकत्र जोडतात तसे तिनेहि आपले चिमखडे पंख उभारले व ऐरावताची विनवणी केली "गजकुलश्रेष्ठ महाराज, माझ्या बछडयांना मारू नका हो !"

ऐरावताने तिला सांगितले "चिमखडे! तुझ्या छोटया बाळांना किंचितहि इजा पोहोचविण्याचे मी मनांत देखील आणणार नाही. तुझे हे छोटे बाळ घरटयाबाहेर आले होते त्याला मी पुनः उचलून जागेवर ठेवलं इतंकच !"

कळपांतील हत्तिणीसाठी वेगळी विणीची जागा शोधून काढण्याचे ऐरावताने ठरविले. त्या भट्टतितर कुटुंबास त्रास न देण्याबद्दल सांगितल्यास कळपांतील सर्व हत्ती त्यांचे ऐकतील याची त्याला शंका नव्हती. परंतु त्या छोटया जागेत इतके सारे हत्ती तेथे एकत्र आल्यास, नकळत का होईना त्यांच्याकडुन त्या पिल्लांना त्रास होण्याचा संभव होता. त्यामुळे तो तसाच पुढे दुसऱ्या जागेच्या शोधांत निघाला. सुदैवाने त्याला तशी मोठी प्रशस्त जागा मिळालीहि! ती तर या जागेपेक्षाहि अधिक चांगली होती. नंतर तो आपल्या कळपाकडे परतला व साऱ्यांना बरोबर घेऊन त्या नव्या जागी आला. तो कळप त्या पहिल्या जागेसमोरुन पुढे जात असता ऐरावत एखाद्या पहारेकऱ्यासारखा त्या घरटयाजवळ उभा राहिला. कोणाहि एखाद्या हत्तीने तेथे वळून चुकूनमाकून ते घरटे व त्यांतील पिल्ले, त्यांचे आई-बाप या कोणास पायाखाली चिरडून टाकण्याचा प्रश्नच उरला नव्हता.

तो कळप त्या जागेवरुन प्रस्थान करीत असता ती संपूर्ण जागा त्यांच्या पावलांनी हादरत होती. सुरवातीस ती नर-मादी चांगलीच घाबरलेली होती. परंतु नंतर ऐरावत तेथे त्या घरटयाच्या संरक्षणासाठी उभा राहिल्यावर त्याची वृत्ति, दृष्टि व कृति पाहून त्यांना धीर आला. कळपातला शेवटचा हत्ती पुढे निघून गेल्यानंतर ऐरावताने त्यांना सांगितले, "आतापर्यंत तर सर्व काही व्यवस्थित पार पडलं आहे. तरीहि तुम्हाला दक्ष राहिलं पाहिजे. एक मत्त हत्ती आमच्या कळपाच्या मागोमाग हिंडत असतो. आता तो आमच्या कळपांत येणारहि नाही. पण कदाचित् याच मार्गाने इकडे येईल".

थोडे दिवस लोटले व तो मत्त हत्ती त्या वनांतील झाडेझुडुप मोडून टाकीत तेथे आला. तो त्यावेळी अत्यंत चिडलेला होता. त्याने स्वैरपणे वाटेतली कोवळी व छोटी झाडे तोडून टाकली व चहूंबाजूस फेकून दिली. आजूबाजूच्या रानांतील लहान पशुपक्ष्यांना उगीच घाबरुन सोडण्या-करीता तो मधूनच जोरजोरांत चित्कार करीत होता. झाडीतले, दलदलींतले, पाणथळींतले सारेच छोटे पशुपक्षी घाबरून गेले होते.

ती बिचारी पक्षिणी भयव्याकुळ होऊन त्या मस्त हत्तीजवळ गेली व त्याला विनवूं लागली, "अरण्याचे महाराज ! तुम्ही दऱ्याखोऱ्यांतून उंचनीच जागांवरून फिरत असतां ! माझा हा नम्र प्रणिपात स्वीकारा. या जगांत मला जर काही मोलाचं म्हणून असेल तर ही लहानगी बाळेच! ती इतकी छोटी आहेत की त्यांना उडताहि येत नाही. कृपावंत व्हा आणि त्यांना वांचवा ! तुमच्या या दयाळूपणाबद्दल देव तुम्हाला दीर्घ आणि सुखी आयुष्य देईल."

पण या दुष्ट हत्तीने उत्तरादाखल तिच्याकडे खुनशी व क्रूर नजरेने पाहिले. त्या लाल-भडक डोळ्यांत दयेचा टिपुसहि नव्हता. "मी त्यांना मारणारच ! मी किती शक्तिमान् आहे, ते साऱ्या जगाला कळलच पाहिजे. माझ्यामुळे प्रत्येकाच्या हृदयांत धडकीच भरली पाहिजे." इतके बोलून त्या उद्दाम हत्तीने त्या झुडुपांत प्रवेश करून ते घरटे जमिनीवर पाडले, अर्थात ती छोटी बाळेहि त्याच्याबरोबर खाली पडलीच ! त्या पिल्लांना वांचविण्याच्या यत्नांत त्यांची आई-ती पक्षिणी-देखील त्या उन्मत्त जनावराच्या पायाखाली चिरडून ठार झाली. तिची बाळे तर अगोदरच देवाघरी गेली होती.

नर (पक्षी) पिल्लांसाठी पाणी आणावयाला गेला होता. तो तेव्हढ्यांतच परतला. समोर काय घडत आहे हे तो बिचारा अगतिक होऊन बघतच राहिला. दु:खाने व रागाने तो जणु वेडाच झाला. त्याने जास्तीत जास्त केले ते एवढेच की तो त्या मस्त हत्तीच्या सुपाएवढ्या कानाजवळ जाऊन जोरांत किंचाळला, "माझ्या बायकोला नि बछड्यांना तू कारण नसतां मारले आहेस पण यांतून तू सुटशील असं मात्र समजूं नकोस ! तू माझ्याहून कित्येक पटींनी जबर असशील, पण तुला नाहीसा करण्याचा उपाय मी शोधून काढीनच काढीन." त्या हत्तीने त्याला आपल्या सोंडेने पकडण्याचा यत्न केला पण तो त्याच्या तावडीतून निसटला. "काय करशील रे तूं माझं चिमुरड्या ?" त्या हत्तीने तुच्छतेने त्याच्याकडे पाहत विचारले. आणि विसावा घेण्यासाठी अंग टाकलं. सगळी सकाळ असल्या भयानक व निरर्थक विध्वंसांत घालविल्यानंतर त्याला विश्रांति हवीच होती.

एव्हीतेव्ही त्याबिचाऱ्या पक्ष्याची जोडीदारीण व पिल्ले देवाघरी गेलेलीच होती. पण तो मात्र आता स्वाभाविक सुडाने पेटून उठला होता. या हत्तीचा नाश कसा करावा, याचाच तो सतत विचार करीत होता. त्या मदोन्मत्त हत्तीचा कायमचा निकाल लावणे एवढीच काय ती आकांक्षा आता त्याच्या आयुष्यांत उरलेली होती. पण आपल्यासारख्या चिमुकल्या पक्ष्याने एवढ्या अवाढव्य व प्रबळ हत्तीचा बंदोबस्त कसा करावा, हाच प्रश्न त्याला पडलेला होता. पण रात्रंदिवस त्याला आणखी कसलाच विचार सुचत नव्हता.




एक दिवस त्याला असे दिसले की, एक गिधाड, एका लहानग्या कावळयावर झडप घालण्याच्या बेतांत आहे. परंतु या भट्टतितरने त्याला वेळीच सावध केल्यामुळे त्या कावळयाला आपले प्राण वाचविता आले. याचा परिणाम म्हणजे त्या कावळयास भट्टतितर बद्दल स्वाभाविकच कृतज्ञता वाटली व तो त्याचा चांगला मित्र झाला. या उपकारांची फेड करण्याचीही त्याची इच्छा होती. मग भट्टतितरनेहि त्या कावळयास उन्मत्त हत्तीने आपल्या बायकोमुलांना कसे मारले ते सांगितले व या कृत्याचा बदला घेण्याच्या कामी त्या कावळयाची एखाद्या दिवशी गरज भासेल, असेहि सुचविले. ही सर्वच योजना कितपत सफल होईल याबद्दल त्या कावळयासहि शंकाच होती, तरीहि, आपल्याला शक्य होईल तितकी सारी मदत करण्याचे आश्वासन त्याने दिले.

आणखीहि अशाच एका प्रसंगी, भट्टतितरला एक छोटा कीडा दिसला, तो एका झुडपाच्या पानांमधून संथपणे चालत होता पण त्याच पानांमध्ये एक पाल त्याला पकडण्यासाठी लपून बसली होती याची जाणीव मात्र त्याला नव्हती. तेव्हा भट्टतितरने त्यालाहि वेळीच इषारा देऊन सावध केले व त्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्या किड्यानेहि त्याला योग्य वेळी जरूर ती यथाशक्ति मदत करण्याचे वचन दिले. तेथूनच पहाडाखालील एक खडकाच्या ओल्या छिद्रांत एक बेडुकहि राहत होता. एक दिवस भट्टतितरने एक साप त्याला खाण्यासाठी आजूबाजूलाच टपून असल्याचे पाहिले. त्याने त्या बेडकास तसे सावध केल्याने त्याला सुरक्षित जागी आसरा घेता आला. कृतज्ञ बेडकानेहि भट्टतितरला वेळ पडल्यास मदत करण्याचे कबूल केले.

भट्टतितर म्हणाला, “फार छान ! आता तुम्ही काकराज ! तुम्ही असं करायचं की तो हत्ती जेव्हा संतापून सोंडेने त्या रातकिडयाला फटकारुं पाहिल तेव्हा त्याचे डोळे फोडून त्यास आंधळा करायचंस”.


अशा रीतीने त्या दोघांनी आपली कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडली व आपले हत्तीदादा आंधळे झाले. आता कसला आला आहे चारा नि पाणी ? दृष्टि तर पाहिजे ना ? नाही म्हणावयास आजूबाजूच्या परिसराची त्याला थोडीफार जाणीव होती व सोंडेने कांही झाडाझुडपाच्या फांद्या मोडून व त्या खाऊन तो आपली भुक भागवीत असे. पण पाणी ? त्यासाठी तर सरोवरावरच जायला हवे नि संपूर्णतः आंधळेपण आल्याने त्याला त्या त्या सरोवराचा मार्ग सापडणे शक्यच नव्हते.

आता तो भट्टतितर पक्षी आपल्या मित्राकडे बेडकाकडे वळला. “हा हत्ती आता तहानेने इतका व्याकुळ झाला आहे. की त्याला पूर्ण वेडच लागायचं काय ते बाकी राहिलं आहे. आता



उडया मारीत त्या कडयाच्या वरच्या टोकाजवळ जा नि शक्य तितक्या मोठ्यानं डरांव डरांव असं ओरड! तो हत्ती साहजिकच त्या कडयाच्या टोकाजवळ जाईल. नंतर तो तिकडे येऊं लागला की, तूं उडया मारीत कडयाच्या खालच्या टोकाशी जा नि तिथूनहि पुन: डरांव डरांव असे ओरडत राहा". त्याने आपल्या मित्राला सांगितले !

त्याप्रमाणे घडून आल्यानंतर त्या हत्तीला दुरवरून कुठून तरी उंचच जागेवरून बेडकाचे ओरडणे ऐकू आले. ज्याअर्थी बेडकाच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येत आहे त्याअर्थी येथेच जवळपास कुठेतरी पाणी असलंच पाहिजे. त्याने स्वत:शीच विचार केला. तो तहानेने इतका वेडापिसा झालेला होता, की तो तसाच चाचपडत तो चढाव चढू लागला. त्याला दिसत नव्हते खरे पण त्याची श्रवणशक्ति (ऐकण्याचे सामर्थ्य) चांगली शाबत होती. त्यामुळे त्याला



आवाजाची दिशा बरोबर समजत होती. पण तो त्या जागी म्हणजे कडयाजवळ पोहोचला, तेव्हा तेथे नीरव शांतता होती. कारण तुम्ही ओळखलेलंच असेल त्या हत्तीस कडयाच्या रोखाने येतांना पाहून तो बेडूक आपले ओरडणे थांबवून खाली निघून गेला होता व कडयाच्या खालून पुन: ओरडू लागला होता. बेडकांचे ओरडणे एकाएकी कसे थांबले याचे नवल तो स्वत:शी करीत असतांनाच बेडकाचे ओरडणे फिरून ऐकूं येऊं लागले. तो हत्ती जेथे उभा राहिला होता तेथून खालवरून ते ऐकू येत होते तेव्हाँ तेथेच कोठेतरी पाणी असावे असा तर्क त्याने केला व तो खाली उतरूं लागला. पण त्यावेळी तो नेमका त्या कडयाच्या टोकावरच उभा होता. अर्थातच पुढे सरकतांच तो एकदम खालीच कोसळला व गडगडत थेट तळाशी पोहोचला. खाली निवडुंगाच्या काटयांचा व प्रचंड खडकांची एकच गर्दी झालेली होती. त्या सर्वांवर आपटून तो प्राणांस मुकला.

त्या हत्तीने आजवर त्या जंगलातील व आसमंतातील साऱ्याच चिमुकल्या व निरपराध प्राण्यांना विनाकारण व विलक्षण छळलेले होते. त्यामुळे तो मेल्याबद्दल कोणालाच वाईट वाटलें नाही; उलट आनंदच झाला. त्या अरण्यांत व त्याच्या परिसरांत फिरून शांतता व सुरक्षितता नांदू लागली. ऐरावतास मात्र आपल्या एका साथीचा असा अंत व्हावा याबद्दल वाईट वाटले. पण ते त्याच्या मुळच्याच चांगल्या व द्वेषरहित स्वभावामुळे! प्रत्येकालाच त्याच्या वाईट कृत्याचे फळ आज ना उद्या भोगावेच लागते. हा जगाचा शाश्वत नियम ऐरावतास चांगलाच विदित होता व तो ओळखूनच त्याने मनाचे समाधान करून घेतले.

□



शा० छ० मु० नासिक-वि० 2-336 एम० आफ आय० एण्ड बी०/81—22-7-82—2000

प्रकाशन विभाग
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार

